


# आणि ग्रंथोपजीविये

३

## रामदास खरे

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# आणि ग्रंथोपजीविये-३

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन मेल करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# आणि ग्रंथोपजीविये-३

## लेखक : रामदास ग. खरे

# आणि ग्रंथोपजीविये-३

## लेखक : रामदास ग. खरे

**सी-२१३, चंद्रवदन सोसायटी क्र. १,**
**गणेशवाडी, कौशल्य हॉस्पिटल समोर**
**पांचपाखाडी, ठाणे-४०० ६०१.**
**भ्रमणध्वनी : ९८६९०१४३१९ आणि ७५०६२६०२७४.**
**इमेल : rgkhare64@gmail. com**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com
esahity@gmail. com
Whatsapp- 9987737237
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

प्रकाशन : ४ नोव्हेंबर २०२१, (दीपावली शके १९४३)

©esahity Pratishthan®2021

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

***** लेखकाचा परिचय *****



## रामदास ग. खरे

जन्म : १३ फेब्रुवारी १९६४, ठाणे. वाणिज्य शाखेची पदवी. तीस वर्षे बँकिंग क्षेत्रात काम करून २०१७ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतली. लेखनाबरोबरच चित्रकला, फोटोग्राफी, संगीत, दुर्गभ्रमंती, असे छंद जोपासत आहे. विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींची दुर्मिळ अशी ३५० हस्ताक्षर-पत्रे संग्रहित केली आहेत. जून २०१८ मध्ये आर्ट-प्रिव्हिलेज, ठाणे येथे पहिले सोलो पेंटिंग प्रदर्शन संपन्न झाले. विविध पुस्तकांची, नियतकालिकांची मुखपृष्ठे रेखाटली आहेत.

**प्रकाशित साहित्य** : कवितासंग्रह: स्पंदन (१९९४), जीर्णदेव्हारा (२००४), सी.टी.स्कॅन- (२०१५), आता अटळ आहे (२०२१).

संकीर्ण : कॅलिडोस्कोप -(लेख संग्रह) २०१७, पत्रसंवादु (लेख संग्रह)- २०१८, चरित्र लेखन: प्रभो शिवाजीराजा - २०१८, शूर

आम्ही सरदार- २०१९, 'आणि ग्रंथोपजीविये- भाग १ व २' (ईबुक)- २०२१.

**आगामी पुस्तके** : मणिकर्णिका...राणी लक्ष्मीबाई, स्मरण महाराष्ट्राचे, निमित्त भटकंतीचे, भारतीय संगीत वाद्ये, असे घडले गांधीजी...एकूण तीन भाग,

**सदर लेखन** : लोकसत्ता, गावकरी, लोकमत, महाराष्ट्र दिनमान.

**लाभलेले पुरस्कार :**

अंकुर वाङ्मय पुरस्कार (२००४), शिवांजली साहित्य गौरव पुरस्कार, जुन्नर (२०१६), कोकण मराठी साहित्य परिषद, कल्याण शाखा आणि अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठान -'अक्षरगंध' पुरस्कार (२०१९), 'आता अटळ आहे' या कविता संग्रहाला जळगावचा 'राज्यस्तरीय सूर्योदय काव्य पुरस्कार (२०२१)' नुकताच जाहीर झाला आहे.

विविध ठिकाणी संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात कविता सादरीकरण तसेच आकाशवाणी, मुंबई येथे कविता वाचन, कथा वाचन.

# रामदास खरे यांची ईसाहित्यवर प्रकाशित पुस्तके




कव्हर क्लिका,
पुस्तक वाचा



## ** लेखकाचे मनोगत **



***पुस्तकं ठेवू नयेत कडेकोट बंदोबस्तात***

***नाहीतर त्यांना वाळवी लागते***

***आपल्यातील अज्ञानाची!***

एका भल्या सकाळी माझ्या घरातल्या बुक शेल्फवर उन्हाची कोवळी उन्हं रांगू लागली. नकळत ओळी सुचल्या आणि कविताही अलगद बाहेर पडली. महत्प्रयासाने मी जी ग्रंथसंपदा जमवली आहे त्यातील काही पुस्तके माझ्याशी त्यादिवशी चक्क बोलू लागली. " आम्हाला पुन्हा बाहेर काढा, आमच्यावर लिहा, शब्दांचा विचार गंध दूरवर पसरू दे, ज्ञानाचा तेजोनिधी तळपू दे." तत्क्षणी मनाने काहीबाही ठरवले. येस. उत्तम पुस्तकाचा परिचय वाचकांना द्यायचा. अगदी

सातत्याने. बुक शेल्फ मध्ये नजर टाकताच एकेक पुस्तक आम्हाला बाहेर काढा असे म्हणू लागले. लोकमतचे संपादक श्री संदीप प्रधान यांना ही कल्पना सांगताच त्यांनी लगेच 'आगे बढो' असा ग्रीन सिग्नल दिल्यावर दर रविवारी लोकमतच्या 'हॅलो ठाणे' पुरवणीत पुस्तक परीक्षण झळकू लागले. शीर्षकाचे नाव : 'आणि ग्रंथोपजीविये'. वाचन संस्कृती वाढावी त्यासाठी वेगवेगळे उपक्रम आयोजित केले जातात. त्याचाच एक भाग म्हणून हे सदर सुरु केल्यावर वाचक रसिक या पुस्तकांकडे वळतील, वाचतील, त्यावर चर्चा करतील, इतकाच उद्देश. लेखमालेला वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभला. माझा उद्देश सफल झाला. और क्या चाहिए. लेखमालेसाठी पुस्तकांची निवड अगदी जाणीवपूर्वक केली. जुन्या पिढीतल्या लेखकांबरोबरच सध्याची तरुण लेखक मंडळी काय लिहीत आहेत हेही जाणून घेणे आवश्यक होते. त्यामुळे तो विचार करूनच लेखमाला सुरु केली. सर्व साहित्यप्रकार, विषय यामध्ये समाविष्ट व्हावेत याचाही सूक्ष्म विचार केला. कविता, कथा, कादंबरी, चरित्र, संपादन, व्यक्तिचित्रण, मुलाखती, नाटक, ललित, संकीर्ण, स्फुटलेखन, प्रवासवर्णन, निबंध,

संगीत, चित्रकला वगैरे अशा सर्व विषयांच्या, आशयांचा अंतर्भाव या लेखांतून केला.

**आणि ग्रंथोपजीविये, विशेषी लोकी इये ।**

**दृष्टादृष्टविजये, हो आवे जी ।।**

आपणा सर्वांना माहिती आहेच की 'आणि ग्रंथोपजीविये' या ओळीचा ज्ञानेश्वर माउलींच्या पसायदानात उल्लेख आहे. खूप पूर्वी म्हणजे साडेसातशे वर्षांपूर्वी मुद्रणकला अस्तित्वात माहिती नव्हती तरीही ग्रंथनिर्मिती होत असे. सुवाच्च हस्ताक्षर असलेल्या एखाद्या लेखनिकाची नेमणूक केली जात असे. त्या ग्रंथाची प्रत गावातील एखाद्या मोठ्या मंदिरात ठेवली जायची. त्याचे पठण होत असे. श्रोते जमत आणि ग्रंथातील विचार, प्रकाश सर्वदूर पसरे. अशा लेखनिक, निरुपणकार, पाठक, प्रवचनकार यांना या कामाचा मोबदला म्हणून धन किंवा वस्तू दिली जायची. म्हणजेच ही सारी मंडळी त्याकाळची ग्रंथोपजीवी होते असेच म्हणता येईल. हाच महत्वाचा विचार ज्ञानेश्वर माउलींनी आपल्या रचनेत प्रभावी पणे मांडला आहे. माउलींनी किती सुंदर अर्थ सांगितला आहे

पहा " ज्यांनी ज्यांनी या ग्रंथाचे पालन, पठण केले आहे अशा सर्व लोकांना आपल्या दुष्ट, वाईट प्रवृत्तीवर विजय मिळवून ते समाधानी आणि सुखी व्हावेत."

आज २०२१ उजाडले आहे. माध्यमे आणि तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. पण तरीही पुस्तकाचे महत्व जराही कमी झालेले नाही.जग बदलत आहे. तत्व,निष्ठा अबाधित राखून प्रत्येकाने काळाच्या बरोबर जाणे हे व्यवहार्य आहे. या साऱ्याचा विचार करून 'आणि ग्रंथोपजीविये' हे पुस्तक ईबुक स्वरूपात काढले तर पुस्तकातील विचारांचा गंध जगभरात कुठेही पसरू शकतो. तोही एका क्लिक सरशी! अशाच एका विचार वळणावर अवचितपणे ई - साहित्य प्रतिष्ठानचे श्री सुनील सामंत यांचा परिचय झाला. त्यांच्याशी संवाद साधल्यावर सध्याच्या काळात ईबुक हा एक चांगला पर्याय असल्याचे मला जाणवले. त्यादृष्टीने तयारीही सुरु केली. ६ जानेवारी २०१९ ते २९ डिसेंबर २०१९ या कालावधीत लोकमतच्या 'हॅलो ठाणे' आवृत्तीत एकूण ३८ पुस्तक परीक्षणे प्रसिद्ध झाली. त्यानंतरच्या काळात सकाळ, तरुण भारत, रुची (ग्रंथाली), ठाणे वैभव या ठिकाणी लिहिलेली बारा अशी एकूण

पन्नास परीक्षणे यांचे ईबुक करण्याचे ठरवले. श्री सुनील सामंत यांचे सूचनेनुसार या पन्नास लेखांचे चार भाग (प्रत्येकी १३ लेखांचे एक पुस्तक) करून चार ईबुक करण्याचे फायनल केले. लेखांसोबत त्या त्या पुस्तकाचे मुखपृष्ठ आणि प्रकाशकांचा तपशील देखील देण्यात आला आहे.

ज्येष्ठ कवी, समीक्षक, निरुपणकार श्री अरविंद दोडे यांना ही कल्पना आवडली आणि त्यांनी या माझ्या ईबुक साठी पाठराखण (Blurb) केली आहे. त्यांचे मनापासून आभार. लोकमतच्या ठाणे कार्यालयाचे संपादक श्री संदीप प्रधान आणि स्नेहा पावसकर यांचे विशेष आभार. या प्रवासात सौ वृषाली शिंदे यांचीही मोलाची मदत झाली त्यांचेही आभार. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे या ईबुकमध्ये समाविष्ट झालेल्या सर्व पुस्तकांच्या लेखक-कवी मंडळींना, प्रकाशकांना शतशः धन्यवाद. त्यांच्याशिवाय ही लेखमाला पूर्णत्वाला गेलीच नसती.

१० सप्टेंबर २०२१ रोजी या पुस्तकाच्या पहिल्या भागाचे (लेख क्र १ ते १३) प्रकाशन कवी, समीक्षक श्री अरविंद दोडे यांचे हस्ते झाले. आणि ९ ऑक्टोबर २०२१ रोजी दुसऱ्या

भागाचे (लेख क्र १४ ते २६) प्रकाशन ज्येष्ठ समीक्षक, संशोधक डॉ अनंत देशमुख यांचे हस्ते झाले. त्यास वाचकांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. आज वाचकांच्या चरणी याच पुस्तकाचा तिसरा भाग (लेख क्र. २७ ते ३९) अर्पण करताना पुन्हा आनंद आणि समाधान वाटत आहे. आपल्या अभिप्रायाच्या प्रतीक्षेत.

'आणि ग्रंथोपजीविये' या माझ्या ईबुक पुस्तकाचा गंध जगभरातील वाचक रसिकांपर्यंत, ग्रंथालयांपर्यंत दरवळू दे अशी प्रार्थना श्री सरस्वती देवीच्या चरणी करतो आणि तूर्तास थांबतो.

**रामदास खरे, ठाणे**...

## शुभेच्छा

या पुस्तकात साधारणतः साठोत्तरीतील अभिजात ग्रंथांपासून आताच्या काळातील दर्जेदार ग्रंथांचा सखोल परिचय करून देण्यात आला आहे. आस्वादक समीक्षेला परीक्षणाचा वेगळा आयाम देताना कवी, लेखक, चित्रकार रामदास खरे यांचा हा वेगळा पैलू ग्रंथमित्रांसमोर येत आहे. दुर्गा भागवतांच्या 'पैस' पासून सुरु झालेल्या या यात्रेत ग्रेस, श्री. ना. पेंडसे, गोनीदा, जयवंत दळवी, मतकरी, महानोर, पाडगावकर, मधु मंगेश कर्णिक, खानोलकरांना सामावून घेत पुढील पिढ्यांचे प्रतिनिधित्व करणारे अच्युत गोडबोले, मंगला आठलेकर, अशोक बागवे, डॉ. वसुधा सहस्रबुद्धे आदी नामवंतांचा सहभाग आहे. तर नव्या पिढीतील किरण येले, सतीश सोळांकूरकर, प्रतिभा सराफ, गीतेश शिंदे, सुजाता राऊत आदींच्या पुस्तकांची दखल घेताना रामदास खरे यांनी सारांशात त्या साहित्यिकांची वाटचालही अधोरेखित केली आहे. एकूण पन्नास लेखांची चार पुस्तके करण्याची कल्पना अभिनव आहे.

हा केवळ भाष्यग्रंथ नसून स्वतःची निरीक्षणे सुद्धा लेखकाने नोंदविलेली आहेत. हा एक सुंदर आणि संग्राह्य ग्रंथानुभव आहे. या 'ई-बुक' चे स्वागत वाचक- रसिक, ग्रंथप्रेमी करतीलच असा विश्वास आहे.

**अरविंद दोडे (कवी, समीक्षक, निरुपणकार)**

## ** अनुक्रमणिका **

२७. अमूर्त आयुष्याचा कॅनव्हास : गायतोंडे..... सतीश नाईक

२८. लोभसवाणी व्यक्तिचित्रणे..... प्रा. प्रतिभा सराफ

२९. मोराची बायको : संदिग्ध कथांचा कोलाज.... किरण येले

३०. अस्वस्थ संवेदनाची मूक कविता.... सतीश सोळांकूरकर

३१. समृद्ध जगण्याचं तंत्र व मंत्र : मजेत जगावं कसं?.... शिवराज गोर्ले

३२. संवादकांच्या अनोख्या भावविश्वात..... अशोक चिटणीस व डॉ शुभा चिटणीस

३३. आठवणींचा विलोभनीय लोलक..... श्याम पेंढारी

३४. लालित्यपूर्ण अक्षरांची नादवलये..... अशोक गुप्ते

३५. समुद्रायन : पत्रसंवादातून उमटलेली हळुवार गाज.... कॅप्टन वैभव दळवी

३६. भावव्याकुळ तिन्हीसांज.... सुमन फडके

३७. या विश्वाची एकतानता हे माझे गाणे.....जयश्री देसाई

३८. अजून माझा करार बाकी आहे,,, आप्पा ठाकूर

३९. पुन्हा जन्मावा...खलील जिब्रान.....डॉ सहदेव चौघुले-शिंदे

# २७. ** अमूर्त आयुष्याचा कॅनव्हास : गायतोंडे **



“मला अमूर्त चित्रकार म्हंटलंत, तर मला खरं तर आश्चर्यच वाटेल. व्यक्तिशः मला वाटतं, की मी कुठलीच लेबलं वापरू नयेत. लोकं सांगतात की तुमची चित्रं आम्हाला 'कळत' नाहीत. पण याचा अर्थ मला माझ्या चित्रातून काहीही सांगायचं नाही, असा मात्र नाही. मी कधीही कुठलीही विधानं करत

नसेन- मला ती कधीच करायची नसतात- पण मला जे व्यक्त करायचं असतं ते मी कमीत कमी शब्दात व्यक्त करतो. मी काही कुठलंही तत्व, श्रद्धा, विश्वास किंवा एखादी अरुंद निष्ठा यांच्याशी बांधील नाही. . मी स्वतः सर्वात प्रथमतः आणि सर्वात महत्वाचं म्हणजे एक व्यक्ती आहे. मी एखाद्या सामूहिक विचारानं घेरला जाऊ शकत नाही. माझ्या तर्कबुद्धीला जे पटेल तेच मी मान्य करतो. मी जे काही रंगवतो ते स्वतःसाठी, स्वतःपुरतं तरी खरं असतं. तरीही त्यात मी काही प्रमाणात इतरांचाही विचार करतो. म्हणूनच मी माझ्या चित्रांना शीर्षकं देत नाही. तसंच माझ्या एखाद्या चित्रात, रचनेत एकाच रंगाचं वर्चस्व असतं. संगीताच्या भाषेत सांगायचं झाल्यास-मी रंग ऐकतो.!"

आपल्या अमूर्त चित्रशैलीत अवघ्या कॅनव्हासवर विचारांचे, भाष्याचे आणि शब्दरंगांचे फटकारे मारणारे भारताचे सर्वश्रेष्ठ चित्रकार वासुदेव संतू गायतोंडे (१९२४-२००१) यांच्या एका दुर्मिळ मुलाखतीतलं हे मनोगत. १९६४ सालच्या इलस्ट्रेटेड विकली या वृत्तपत्रात गायतोंडे सरांची मुलाखत प्रसिद्ध झाली होती त्यातला हा अंश.

" हे...हे.. गायतोंडे म्हणजे नेमके कोण हो? ज्यांचं चित्रं तीस कोटींना विकले गेले तेच का हो? " आपल्या मधील अनेकांना गायतोंडे सरांबद्दल इतकीच माहिती असावी. आयुष्यभर अज्ञाताच्या प्रदेशात आणि एकांताच्या भिंतींमध्ये स्वतःला बंदिस्त करीत, जीवनाकडे तटस्थपणे पहात सतत चित्रनिर्मितीच्या, चित्रविचारांच्या कैफात आकंठ बुडालेले आणि वर्षाला फारतर चार किंवा पाच दर्जेदार चित्रांची निर्मिती करणारे गायतोंडे सर नेमके होते तरी कोण? ज्याप्रमाणे एखादा साधक आत्मशोधाचा सतत ध्यास घेत असतो अगदी तसाच ध्यास गायतोंडे सरांनी चित्रकलेबाबतीत घेतला होता. चित्रकला हा त्यांचा ध्यास आणि श्वास होता. जागतिक चित्रकलेच्या प्रांगणातले ते एक स्वयंभू विद्यापीठ होते. गायतोंडे यांची चित्रं डोळ्यांनी, बुद्धीनं, मनानं, दृष्टीनं पाहिली तरच ती आपणाला काही प्रमाणात तरी समजतात.

आपल्या देशात किंवा इतर देशात एखादा कलावंत जेव्हा जिवंत असतो तेव्हा त्याची अनेक पातळ्यांवर उपेक्षा ही होत असते. वेदना सहन कराव्या लागतात. मात्र त्याच्या मृत्यूनंतर अचानक त्या कलावंताचा मोठेपणा जगाला समजतो.

हा जगाचा न्यायच आहे. त्यांच्या कलाकृतींवर भरपूर चर्चा होते, पुस्तके निघतात, पारितोषिके, पुरस्कार दिले जातात. आता हेच पहा ना. गायतोंडे यांच्या मृत्यूनंतर तब्बल चौदा वर्षानंतर २०१५ मध्ये ख्रिस्तीज'च्या जागतिक लिलावात गायतोंडे यांनी रेखाटलेल्या चित्राला २९ कोटी ३० लाख २५ हजार रु. इतकी प्रचंड विक्रमी बोली लावली गेली आणि ते चित्र तितक्याच किंमतीला विकलं गेलं. या महान चित्रकाराची नोंद जागतिक पातळीवर अखेर घ्यावीच लागली.

गायतोंडे यांचं एकूण व्यक्तिमत्व, त्यांचं आयुष्य हे जणू एखाद्या अमूर्त चित्रासारखेच गूढ, धूसर होतं . त्यांच्याबद्दलची दुर्मिळ माहिती उपलब्धच नव्हती, आणि असलीच तर ती विखुरल्या स्वरूपात होती. ठाण्यातले चित्रकार सतीश नाईक यांनी या महान चित्रकाराचे यथार्थ दर्शन रसिकांना, अभ्यासकांना, विद्यार्थ्यांना दाखवायचेच या जिद्दीने कामाला लागले. नाईक अनेकांना भेटले. अखंड वणवण, चर्चा, संदर्भ ग्रंथ, अभ्यास, पुन्हा चर्चा. आणि शेवटास ठरवले हा ग्रंथ आपणच ‘चिन्ह’ या आपल्या प्रकाशन संस्थेतर्फे लवकरच प्रकाशित करायचा आणि ती शुभवेळही आली.

चित्रकार सतीश नाईक यांनी संपादित केलेल्या आणि चिन्ह पब्लिकेशन्स यांनी प्रकाशित केलेल्या 'गायतोंडे' या महान ग्रंथाचे प्रकाशन दि. ३० जानेवारी २०१६ रोजी गानसरस्वती किशोरी आमोणकर यांच्या हस्ते मुंबईत झाले त्यावेळी कलाविश्वातील अनेक दिग्गज कलावंत मंडळी समारंभास आवर्जून उपस्थित होती. त्याचवेळी 'गायतोंडे' ग्रंथाची जनआवृत्ती देखील प्रकाशित झाली. ती आवृत्ती मी मिळवली आणि 'गायतोंडे' हे पुस्तक मी झपाट्यानं वाचून काढलं . १७८ पृष्ठांच्या या ग्रंथात सामावला आहे 'गायतोंडे' या चार अक्षरी चित्रकाराच्या कार्यकर्तृत्वाचा भव्य कॅनव्हास, अनेक आठवणींचा, संदर्भांचा मान्यवरांनी घेतलेला मागोवा, केलेलं मौलिक भाष्य वाचण्यासारखे आहे. किशोरी दास, सुनीता पाटील, विश्वास यंदे, शांताराम वर्दे, प्रफुल्ल डहाणूकर, मनोहर म्हात्रे, सच्चीदानंद दाभोलकर, शरद पाळंदे, लक्ष्मण श्रेष्ठ, दादीबा पंडोल, सुनील काळदाते, नितीन दादरावाला, फिरोझ रानडे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, नरेंद्र डेंगळे यांचे मौलिक लेख तर मुलाखतीच्या माध्यमातून गायतोंडे यांना बोलते करणारे प्रितीश नंदी, प्रमोद गणपत्ये, अव्यक्ता दास यांनी घेतलेल्या

मुलाखती गायतोंडे यांच्या एकूण चित्रप्रवासावर नेमके भाष्य करतात.

गेली कित्येक वर्षे 'गायतोंडे' या मनस्वी चित्रकाराच्या कलाकृतींनी अक्षरशः झपाटलेले आणि मोठ्या कष्टानं जमवलेलं हे सारं संचित रसिकांना, अभ्यासकांना, विद्यार्थ्यांना या ग्रंथाद्वारे बहाल करणारे चित्रकार सतीश नाईक आपल्या संपादकीय मधून आपल्याशी संवाद साधतात. " स्वातंत्र्योत्तर भारतात अमूर्त चित्रकलेचा पायाच रचून आपलं कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या आणि जगमान्यता मिळवलेल्या एका चित्रकारावर असं आणि इतकं मोठं दस्तावेजीकरण करण्याची अशी संधी सहजासहजी कुणाला मिळत नाही. संपादक म्हणून मला ती मिळाली. जे.जे. स्कुल ऑफ आर्टच्या भिंतीवर १९७४ किंवा १९७५ साली पाहिलेल्या गायतोंडे यांच्या एका चित्राच्या प्रदर्शनानं सुरू झालेल्या प्रवासाच्या वर्तुळाचं टोक २०१६ साली म्हणजे तब्बल चार दशकानंतर आता एकमेकाला जोडलं गेलं आहे. संपूर्णतः संन्यस्थ वृत्तीनं आयुष्य जगलेले गायतोंडे कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता अंगीकारलेलं कार्य आयुष्यभर एखाद्या व्रतस्थाप्रमाणे करीत राहिल्यास

अंतिमतः यशप्राप्ती ही होतेच असा काही लोकविलक्षण संदेश देत परत न येण्याच्या वाटेनं कधीच निघून गेले. मला भावलेलं, जाणवलेलं हे सारं किंवा गायतोंडे यांची ही अलौकिक थोरवी साऱ्या जगाला कळायला हवी होती असा मला अगदी आतून, मनापासून वाटलं आणि ठरवलं. शब्दांच्या माध्यमातून गायतोंडे यांचं व्यक्तिमत्व उभं करायचं आणि हा ग्रंथ पुढली अनेक दशकं कदाचित शतकं सुद्धा भावी पिढ्यांना एखाद्या दीपगृहासारखं मार्गदर्शन करीत राहील."

या पुस्तकाला प्रसिद्ध चित्रकार प्रभाकर कोलते यांनी अभ्यासपूर्ण प्रस्तावना दिली आहे. त्यात ते म्हणतात " एका भीषण अपघातात गायतोंडे यांचे शरीर मोडलं पण मौनाचा कणा अधिक कणखर झाला. त्यानंतर मौन हेच बोलणं झालं. ज्यांना त्यांची मौनाची भाषा कळली त्यांनी त्यांना प्रश्न केले नाहीत. ज्यांनी प्रश्न केले त्यांना गायतोंडे यांनी आपल्या चित्रांतून उत्तरं दिली. स्वतःला पृथ्वीवरचा रहिवासी समजणाऱ्या गायतोंडे यांचा जन्म कुठं झाला, बालपण कुठं गेलं, तारुण्यात त्यांनी काय केलं, म्हातारपणात काय भोगलं, ते दिल्लीला का स्थलांतरित झाले, पुन्हा मुंबईला का आले

नाहीत, या साऱ्या प्रश्नांची उत्तरं अनुत्तरितच राहणार आहेत किंवा त्यांची अनेक वेगवेगळी उत्तरं अस्तित्वात येतील, दंतकथा, आख्यायिका तयार होतील. चित्रांव्यतिरिक्त इतर अनेक रूपकांतून गायतोंडे शिल्लक राहतील. संपूर्ण गायतोंडे कधीच कुणाला सापडणार नाहीत. पूर्णत्वाची हीच किमया असते. पूर्ण असलं तरी अपूर्णच वाटत राहणारं!"

सदर ग्रंथात गायतोंडे सरांची एकूण बारा रंगीत चित्रे समाविष्ट केली आहेत. गायतोंडे सरांबद्दलच्या आठवणी अनेकांनी जागवल्या आहेत. गायतोंडे यांची बहीण किशोरी दास काय म्हणते पहा " माझा भाऊ, बाळ? शेवटपर्यंत तो अव्यक्तच राहिला. आपल्या न कळणाऱ्या चित्रांतूनच परस्पर संवाद साधत राहिला. आयुष्यभर त्याने कधी देवाला हात जोडला नाही. पण सगळे पाश तोडा, मायेत गुंतू नका, असं देवाचं वचन मात्र त्यानं तंतोतंत पाळलं.!"

लेखक-कलासमीक्षक ज्ञानेश्वर नाडकर्णी: "अभ्यासाच्या जोडीला एक प्रकारचा खंबीरपणा गायतोंडे यांच्यात आला होता. कुटुंबाचे कोणत्याही प्रकारचे पाश त्यांनी ठेवले नाहीत. सारेच फार फार पूर्वी झुगारून दिलेले. झेन तत्वज्ञानालगत हा

आपोआपच पोचलेला आहे." चित्रकार प्रफुल्ला डहाणूकर म्हणतात "तो एकलकोंडा होता. एकटाच राहायचा. त्यामुळे तो वेगळा भासायचा. चित्रांवर तो कधी बोलायचा नाही. बोलायचा तो फक्त फिलॉसॉफी, सिनेमा आणि झेनवर!"

'गायतोंडे' या ग्रंथाचा अनुवाद आता हिंदी आणि इंग्रजी भाषेतही लवकरच होणार आहे असे ग्रंथाचे संपादक, चित्रकार सतीश नाईक यांनी सांगितले. 'गायतोंडे' ग्रंथाच्या मलपृष्ठावरील ओळी आपल्याला निःशब्द करतात." गायतोंडे या प्रतिभावान चित्रकाराची कहाणी राहत नाही, तर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवरही मात करून ध्येय साध्य करण्यासाठी पुढं पुढं सरसावणाऱ्या तुमच्या-आमच्यासारख्या कुणाही प्रयत्नशील माणसाची वैश्विक कहाणी होते. त्यांच्यातल्या आणि आपल्यातल्या साम्यस्थळांतला फरक मात्र हा ग्रंथ हाती पडताच संपतो.!"

**(गायतोंडे (चरित्रात्मक लेख), संपादन : सतीश नाईक, चिन्ह पब्लिकेशन्स, ठाणे)**

# २८. ** लोभसवाणी व्यक्तिचित्रणे **




**मान वर करून डोंगराकडे पाहताना फार कौतुक वाटायचं**

**त्याच्या कड्याचं..**

**आणि मान आपोआप झुकायची त्याच्या उंचीपुढं.**
**आता...**
**आता गगनचुंबी इमारतीवरूनच नजरेच्या रेषेत**
**डोंगराचा कडा दिसतो, मान खाली नि वर करावीच**
**लागत नाही.**
**आणि एकंदरीत कशालाही मान देण्याची वृत्ती,**
**मानसुद्धा विसरून गेली!**

काही वर्षांपूर्वी व्यास क्रिएशन्स यांनी प्रकाशित केलेल्या 'माझा कुणीतरी' या ललित लेख संग्रहात प्रतिभाताईंची ही एक वेगळी रचना वाचण्यात आली. एक साधेसे दृश्य जे आपण महानगरात रोज पाहतो आणि सोडूनही देतो. मात्र एखाद्या संवेदनशील, कवी मनाच्या व्यक्तीला तेच दृश्य पाहून काही वेगळे सुचते, एखादे तत्वज्ञान देऊ पाहते. या भूतलावर जसे अनेक डोंगर, शिखरं आपणाला दिसतात अगदी त्याचप्रमाणे आपल्या कार्यकर्तृत्वाने डोंगराएवढं अफाट काम केलेली काही दिग्गज व्यक्तिमत्वं देखील दिसतात. त्यांना हे असे जमले मग आपणाला का असे जमू नये असा प्रश्नही सहजपणे आपणाला

पडतोच. त्याचे उत्तर देखील आपणाला माहित असते. प्रचंड मेहनत, चिकाटी, नाविन्याचा ध्यास, सकारात्मक दृष्टिकोन, आणि सर्वात महत्वाचे माणसाला माणूस म्हणून समजून घेणे. या सर्व गुणवैशिष्ट्याने ती व्यक्ती प्रत्यक्षात डोंगराहून मोठी होते, यशाची शिखरं तिला रोजच खुणावत असतात. अनंत अडचणी पार करून ती व्यक्ती ते शिखर गाठतेच. आपण अशाच डोंगरापाशी नतमस्तक व्हायचे असते, त्यांच्या थोर कार्यापुढे आपली मान खरोखरच झुकवायची असते. कवितेतला अर्थ मला उमजला आणि त्याच वेळी 'आजच्या आघाडीच्या कवयित्री, लेखिका, संवादिका, उत्तम व्याख्याती प्रतिभा सराफ यांचा नुकताच प्रकाशित झालेला 'सहजसंवाद' हा व्यक्तिचित्रणे साहित्यप्रकारातला सुंदर संग्रह हाती आला. याचसोबत प्रतिभाताईंनी २००५ साली केलेल्या त्या कवितेचा प्रत्यय देखील आला.

'सहजसंवाद' म्हणजे विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींशी साधलेला एक सहज, सुंदर, सुसंवाद, मनमोकळ्या गप्पाच. आयुष्याच्या वेगवेळया वळणांवर, टप्प्यांवर अनेक व्यक्ती विविध पातळींवर लढत असतात, जीवनाला सामोरे

जात असतात. अर्थात ही क्षेत्रेही वेगवेगळी आहेत. यामध्ये कवी, लेखक, नाटककार, चित्रकार, गायक, संगीतकार आहेत. तर काही जण अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये जिद्दीने उभ्या राहणाऱ्या, आयुष्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहणाऱ्या आणि आपले आयुष्य सुंदर घडवणाऱ्या काही व्यक्ती देखील आहेत.

भौतिकशास्त्रासारख्या अतिशय गद्य आणि रुक्ष विषयाचे अध्यापन करणाऱ्या प्रतिभाताईंबद्दल कौतुक आणि आश्चर्य देखील वाटतं. याचे कारण म्हणजे भौतिक शास्त्र आणि विज्ञान विषय घेऊन पदवीधर झालेल्या प्रतिभाताईंना माणसं जोडण्याची तसेच त्यांच्याशी संवाद साधण्याची केमिस्ट्री मात्र सुरेख जमली आहे. एकीकडे गद्य, रुक्ष विषयाचे अध्यापन करीत असतानाच स्वतःमध्ये अवचितपणे गवसलेली हळुवार कविता प्राणपणाने जपलेली आहे. त्या उत्तम गझलकार आहेत. कविता, कथा, कादंबरी, ललित अशा सर्वच प्रकारात त्यांनी विपुल लेखन केले आहे, अनेक पुस्तके प्रकाशित आहेत. अनेक महत्वाचे पुरस्कार त्यांना लाभले आहेत. आकाशवाणी, दूरदर्शन इथे त्यांचे अनेक साहित्यविषयक उपक्रम प्रसारित झाले आहेत. तसेच अनेक संस्थांशी त्या जोडल्या गेल्या

आहेत. चर्चासत्रे, कार्यशाळा, सूत्रसंचालन, अशा विविध स्तरांवर त्या वेळोवेळी व्यक्त होत असतात. त्यांनी आयोजित केलेले अनेक कार्यक्रम मी स्वतः पाहिले आहेत. तात्पर्य काय बोलघेवडा, निर्मळ स्वभावामुळे संवाद जपण्याची कला त्यांना जमली आहे आणि त्यांनी ती जपलीही आहे.

विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने प्रतिभाताईंना वेगवेगळया क्षेत्रातल्या महनीय व्यक्ती टिपता आल्या. त्यांच्याशी सहज संवाद साधताना हेही लक्षात आले की या व्यक्तींमध्ये सामावलेली ही अनोखी माहिती वाचकांना उपलब्ध करून दिली तर? झाले. प्रतिभाताई तर कामालाच लागल्या. २००२ सालापासून ते २०१८ पर्यंत विविध मान्यवर मंडळींच्या मुलाखती घेतल्या, त्यांचे सुंदर लेख विविध वृत्तपत्रात, मासिकात झळकले आणि बघताबघता त्या निवडक लेखांचे सुंदर पुस्तक देखील झाले. 'सहजसंवाद'. नावामध्येच अर्थ सामावलेला आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ देखील अतिशय बोलकं आहे. समोरचा माणूस वाचताना आपणाला तो पूर्ण समजला असे कधीच होत नाही. खरं तर तो फक्त दहा टक्केच

कळतो. तोच विचार मुखपृष्ठावर अलगदपणे उतरवला आहे प्रतिभाताईंच्या चित्रकार कन्येने, निकिताने. तिचेही कौतुक.

प्रस्तुत पुस्तकात एकूण अठरा लेख आहेत. प्रत्येक लेखाच्या शेवटी त्या त्या व्यक्तींची संक्षिप्त माहिती (शिक्षण, कारकीर्द, महत्वाचे टप्पे, पुरस्कार) दिली आहे. त्यामुळे होते काय की, त्या व्यक्तीची अगोदरच माहित असलेली माहिती पुन्हा लेखात देणे टाळले आहे. त्यामुळे त्या व्यक्तीची अन्य वेगळी, दुर्मिळ माहिती आपणाला वाचायला मिळते हे विशेष. प्रख्यात लेखक श्री उत्तम कांबळे यांनी सुंदर आणि नेमकी अशी प्रस्तावना दिली आहे. ते म्हणतात “ सामान्य आणि असामान्य या दोन्ही प्रकारातील व्यक्ती लेखिकेने टिपल्या आहेत. झुंजून झुंजून आयुष्य सुंदर करणारे, शब्दसामर्थ्याच्या जोरावर आयुष्य सुंदर करणारे आणि आयुष्याला लढाईचे नाव देऊन लढत राहणारे अनेकजण ग्रंथात भेटतात. ते जगण्याच्या प्रेरणा देतात. वाचकांच्या मनावर आपल्या लढाईच्या मुद्रा कोरतात.!"

सहजसंवाद हे पुस्तक वाचताना श्री उत्तमराव कांबळे यांच्या विवेचनाचा प्रत्यय वाचकाला ठिकठिकाणी येतोच. सर्वच अठरा लेखांवर लिहिणं केवळ अशक्य आहे. तरीही

वाचकांना काही लेखांचे ओझरतं दर्शन करून देणं आवश्यक वाटते. या मुलाखती साचेबद्ध, अथवा प्रश्नांवलींच्या गर्दीत अडकलेल्या नाहीत तर तो एक मुक्तसंवाद आहे. प्रारंभीचा लेख ज्येष्ठ साहित्यिक, पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्यावरचा आहे. वयाच्या ८८ व्या वर्षी देखील सतत कार्यमग्न, लेखनात दंग असे लोभस व्यक्तिमत्व. गिरगाव येथील साहित्य संघ मंदिर या संस्थेचे आणि मधुभाईंचे अतूट असे नाते आहे. संघाच्या आठवणी जागवताना मधुभाई म्हणतात " साहित्य संघ जी संघटना मला सर्वार्थाने पावली! रंगदेवता प्रसन्न असली की नाटक रंगते त्याचप्रमाणे या पवित्र वास्तूत माझ्या वाङ्मयीन यशाची वाटचाल सुरु झाली. अनेक दिग्गजांचा सहवास या वास्तूत मला लाभला, अनेक व्याख्याने ऐकली. पुढे तर डॉ बाळ भालेरावांच्या आग्रहाखातर मी निवडणुकीला होकार दिला आणि संघामध्ये मी 'विश्वस्त' म्हणून निवडून आलो. साहित्य संघाचे माझ्यावरील ऋण आहे." वसईतले ज्येष्ठ कवी, कादंबरीकार रॉक कार्व्हालो यांचेविषयीची माहिती जास्त कुठे उपलब्ध नाही मात्र या लेखाने ती पूर्ण झाली असे वाटते. 'वर्दळीत असूनही जो तो असतो एकटा, घेऊन खांद्यावर स्वतःचाच बावटा " असं खूप आतलं लिहीणाऱ्या कार्व्हालो

यांचे बद्दल लेखिका लिहितात "कवी रॉक हे नुसतेच साहित्यिक नसून समाजात घडणाऱ्या घटनांबाबत जागरूक आहेत आणि त्यातील प्रश्न सोडवायचा ते प्रयत्नही करतात." गझलयोगी सदानंद डबीर यांचेविषयीचा खूप माहितीपूर्ण लेख आहे. अनेक पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाच्या निमित्ताने लेखिका या गझलकाराला भेटल्या, काही शिकताही आले. गझलेबद्दल डबीर सर भरभरून बोलतात. " साहित्यातील एक छोटंसं अंग म्हणजे कविता, कवितेतील छोटासा प्रकार म्हणजे गझल.! समजायला जितकी सोप्पी तितकी लिहायला मात्र अतिशय अवघड " अतिशय मार्मिक आणि उपहासात्मक शैलीत कविता सादर करणारे मिश्किल कवी म्हणजे अशोक नायगावकर. वाटेवरच्या कविता हा कविता संग्रह, कवितांच्या गावा जावे च्या आठवणी, कवितेचे कार्यक्रम करण्यासाठी गावोगावी केलेली भटकंती, ते हास्यसम्राट या गाजलेल्या कार्यक्रमापर्यंतचा प्रवास सुंदरपणे लेखिकेने रेखाटला आहे. ज्येष्ठ लेखक, नाटककार शं. ना नवरे. गोष्टीवेल्हाळ शंन्नांनी मध्यमवर्गीयांच्या आयुष्याचे चित्रण आपल्या लेखनात केले. आजकालची मुलं मात्र काही वाचत नाहीत याबाबतची खंत ते व्यक्त करतात. अनेक कथांच्या निर्मितीच्या आठवणी लेखिकेने

मांडल्या आहेत. प्रख्यात संगीतकार, गीतकार पं. यशवंत देव यांनी भगवान रजनीश यांचे शिष्यत्व स्वीकारले होते, त्या सर्व आठवणी, तो अध्यात्मिक प्रवास, आपल्या आयुष्यावर झालेला ओशोंच्या विचारांचा प्रभाव प्रभावीपणे लेखिकेने लेखात मांडला आहे. पं. हरिप्रसाद चौरासियांचे पट्टशिष्य श्री विवेक सोनार यांच्या बासरी वादनाचा सुरेल प्रवास रेखाटला आहे. ज्येष्ठ कवी, समीक्षक शंकर वैद्य यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन लेखिकेला अनेकवेळा लाभले आहे. त्यांच्या पुस्तकांची प्रकाशने वैद्य सरांनी केली आहेत, जागवलेल्या अनेक आठवणी या लेखात आहेत. नवीन काही लिहिणाऱ्या असंख्य कवींचे मार्गदर्शक कविवर्य अरुण म्हात्रे. असंख्य कवितांचे कार्यक्रम, भटकंती, अक्षर-चळवळ, ते 'उंच माझा झोका' या शीर्षकगीतापर्यंतचा प्रवास शब्दबद्ध केला आहे. याशिवाय अन्य काही क्षेत्रात प्रतिकूल परिस्थितीत जीवनाला सामोऱ्या जाणाऱ्या प्रज्ञावंतांचा परिचय देखील लेखिकेने करून दिला आहे हे महत्वाचे आहे. वर्तमान काळात जगणारा आणि शिक्षणाचे महत्व जाणणारा सीए अनिल कदम, मुलगी झाली हो सारख्या नाटकाचे अनेक प्रयोग करणाऱ्या ज्योती म्हापसेकर, वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंत तब्बल १००० वेळा

रायगड चढणारे सुरेश वाडकर, बहुआयामी व्यक्तिमत्व असणारे प्रदीप म्हापसेकर, काशीराम हुशे या देवमाणसाचे आत्मकथन, महाराष्ट्रातील महापालिकेतील तमाम आयुक्तांमध्ये एकमेव महिला आयुक्त असणाऱ्या संगीता धायगुडे यांचा थक्क करणारा प्रवास, अशा विविध व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वामुळे हे पुस्तक समृद्ध झाले आहे, वाचनीय झाले आहे.

**(सहजसंवाद (मुलाखती), प्रतिभा सराफ, अनघा प्रकाशन, ठाणे)**

# २९. मोराची बायको : संदिग्ध कथांचा कोलाज




आम्ही चिल्लर सुटे पैसे भुक्कड
तुम्ही बंद्या नोटा फक्कड
आम्ही जगण्याच्या प्रतिक्षेत

**रोज मयताच्या अंगावरुन जायचं**
**तुम्ही मद्यधुंदीत**
**लग्नात बारमध्ये उडायचं**
**सलाम नोटांनो सलाम आम्हा चिल्लरांचा तुम्हाला सलाम**
**त्यातल्या त्यात समाधान एकच**
**आम्ही देवळात देवघरात**
**पूजेच्या तळीत**
**तुम्ही रंगीत माडीवर शेजवर**
**त्यांच्या ब्लाऊजमध्ये, शेजेखाली**
**सलाम!**

अगदी लक्खपणे आठवतंय. काही वर्षांपूर्वी आम्ही ठाण्याच्या नगर वाचनालयात कवितांचा कार्यक्रम एकत्रितपणे केला होता. त्यात किरणने 'आम्ही चिल्लर' ही कविता पेश केल्यावर टाळयांचा एकच कडकडाट झाल्याचे स्मरते. अतिशय नेमकी अशी प्रहरात्मक शब्दकळा. सामाजिक परिस्थितीचे, मूल्यांचे भान. तो दिवस अर्थातच किरणचा होता. त्या दिवसापासून किरणचा आणि माझा दोस्ताना वाढू लागला. आज तर तो कविता, कथा, कादंबरी, नाटक सारे फॉर्म्स मुक्तपणे वापरत आहे, वेगवेगळे प्रयोग करीत आहे. यशाची एकेक

शिखरे पादाक्रांत करीत आहे. किरण माझा खास मित्र आहे याचा अभिमान आहेच. २०१० च्या सुमारास किरणचा 'बाईच्या कविता' हा एक आगळावेगळा कविता संग्रह प्रकाशित झाला.

**आत अन बाहेर..बाई म्हणजे गुंता**
**कधी तिचा तिनंच केलेला**
**कधी दुसऱ्यांनी बनवलेला**
**तिचा तिलाच न सुटलेला**
**पुरुषाला न कळलेला**

असं काही खूप आतलं लिहिणारा किरण आणि फक्त 'बाई' या विषयासंदर्भातील चिंतनात्मक कविता वाचून त्याचवेळी मी हादरलो होतो. किरणचे विषय सर्वसामान्यांचे नाहीत, त्याने डोळसपणे केलेल्या निरीक्षणांचे ते पारदर्शी आरसे आहेत असं मला वाटतं. आणि.. आणि अशाच क्षणी ग्रंथालीने प्रकाशित केलेला किरणचा 'मोराची बायको' हा कथासंग्रह हाती पडला. या संग्रहातील कथा वाचल्यानंतर हिप्नोटाइज किंवा चकवा हा प्रकार काय असतो त्याचा प्रत्यय मला आला. कथा वाचताना मी कुठे तरी कमी पडतो आहे याचे भान सतत

होते, इतक्या विलक्षण ताकदीच्या कथा होत्या. मोराच्या बायको कथेतला एक अंश मी वाचकांसाठी जांणीवपूर्वक देत आहे.

"पीळदार स्नायूंचं पांढरंशुभ्र पुरुषी शरीर. दोन्ही शुभ्र हात कंबरेवर ठेवून, पाठीवर शुभ्र पंख लेवून, खांद्यावर रुळणारे पांढरेशुभ्र केस आणि त्यांतून वर आलेला सफेद तुरा घेऊन, कंबरेतून निघालेला जमिनीपर्यंत रुळणारा मोरपिसारा सांभाळीत फांदीवर उभा, संपूर्ण निर्वस्त्र, त्याचं पौरुषत्व घेऊन, एखाद्या ग्रीक शिल्पासारखा. ती झपझप उठली, इथूनतिथून कागद, पेन्सिल, रंग गोळा केले आणि ती भर मध्यरात्री मनातल्या मोरपुरुषाचं चित्र तन्मयतेनं काढू लागली. पहाट फटफटताना तिचा चेहरा प्रकाशानं उजळत गेला. मनातला मोरपुरुष त्याच्या पौरुषत्व आणि पिसाऱ्यासह, तिला हवा तसा चित्रात उतरत गेला. पहाटे कधीतरी चित्र पूर्ण झाल्यावर तिनं अनिमिष नजरेनं मोरपुरुषाच्या चित्रावर अलवार नजर फिरवली आणि लज्जेची उष्ण झुळूक वाहत तिच्या शरीरभर पसरत गेली. नकळतच तिनं अलगद आपलं बोट चित्रातल्या मोरपुरुषाच्या चेहऱ्यावर ठेवलं आणि ते बोट हळूहळू खाली

सरकवू लागली. ओठ, मान, भरदार छाती, रुंद खांदे, वळदार पोट यांवर बोट सरकवताना अचानक पुन्हा तिच्या पापुद्र्यांतून वाफ बाहेर पडली. ओल जाणवली. लाजून तिनं ते चित्र घाईत कुठल्याशा वहीत लपवलं आणि स्वतःशीच हसत ती गाढ झोपी गेली.”

आदिम काळापासून स्त्रीपुरुष संबंधांबद्दल, त्यांच्यातील शरीर नात्यांबद्दलचे आकर्षण आज जराही कमी झाले नाही. किंबहुना ते दिवसेंदिवस वाढतच आहे, त्यामध्ये अधिक गुंतागुंत होत आहे. भौतिक सुखाचा अतीवापर, रोजचे ताणेबाणे, विसंवाद, आर्थिक गरज, जीवघेणी स्पर्धा, अशी अनेक कारणे आहेत. आर्थिक,सामाजिक विषमता तर आज प्रत्येक क्षेत्रात साठून राहिली आहे तर दुसरीकडे स्त्रीपुरुष विषमता ही वाढतच आहे. शारीरिक ओढ ही एक अभिव्यक्ती असू शकते. ती तर एक मानवी प्रेरणाच आहे. एक सहजसोपी प्रक्रिया आहे. इतिहासाच्या एका टप्प्यावर लग्नसंस्था अस्तित्वात आली. एकदा समाजव्यवस्थेने मान्यता दिल्यावर ते स्त्रीपुरुष कायदेशीररित्या समागम करावयास मोकळे झाले. मात्र यात विश्वास, प्रेम, संमती असणे तितकेच आवश्यक आहे.

आणि नेमकी इथेच ठिणगी पडते. प्रेम,विश्वास,नातं फक्त नावाला उरतं आणि उरतो तो फक्त नरमादींचा शुष्क शृंगार, बलात्कार. पुढे त्या ठिणगीचे वणव्यात रूपांतर होते. त्यात ते दोघेही होरपळून जातात. पारंपरिक मूल्यांमध्ये अडकलेला साचेबंद समाज अर्थात त्या दोघांच्यात तेल ओतत असतो, समाजाच्या दृष्टिकोनातून त्यांच्या जगण्याला पाप पुण्याच्या फूटपट्ट्या लावल्या जातात. नंतर उरतो तो फक्त चिखल, असंवेदना आणि उध्वस्तपण. अनेक लेखक, कवी, नाटककारांनी स्त्रीपुरुषांच्या समस्यांवर वेगवेगळया पातळींवर भरपूर काही लिहिलं आहे. "सेक्स व्यतिरिक्त विश्वात अनेक गोष्टी आहेत, विविध स्तरांचे प्रॉब्लेम्स आहेत. त्यावर लिहा की" काही वाचकांचा असाही सूर असतो. परंतु हे नातेसंबंध फुलावेत, निकोप रहावेत, संवाद, विश्वास वाढावा यासाठी पुन्हा सेक्स या गाभ्याकडे आपणाला वळावेच लागते. त्यामुळे सेक्स हा प्रत्येकाच्या आयुष्यातला एक अपरिहार्य भाग आहे हेच सारे विसरतात.

स्त्रीपुरुष संबंधांवर, लैंगिकतेवर लिहिणाऱ्या लेखकांची परंपरा मोठी आहे. त्यातील काही ठळक नावं म्हणजे

मालतीबाई बेडेकर (विभावरी शिरुरकर), विजय तेंडुलकर, जयवंत दळवी, गौरी देशपांडे, कविता महाजन, मेघना पेठे ते थेट जयंत पवारां पर्यंत. अशांच्या मांदियाळीत स्वतःच्या लेखनाची वेगळी शैली जपणारा, आजच्या समकालीन प्रश्नांना सामोरे जाणारा, भिडणारा, स्त्रीपुरुषांचे अनोखे नाते धीट शब्दशैलीत मांडणारा, आजच्या जगण्यातले चित्रविचित्र ताणेबाणे समजून घेणारा, आणि महत्वाचे म्हणजे एखादे तत्वज्ञान सांगण्याचा अजिबात आव न आणणारा, माझा कवी मित्र किरण येले यांचा 'मोराची बायको' हा कथासंग्रह स्त्रीपुरुषांच्या विविध स्तरांच्या नात्यांची विलक्षण घुसमट अधोरेखित करतो. " बाईचे शरीर म्हणजे वासनेचे आगर आहे, आगर." तेंडुलकरांच्या सखाराम बाईंडर नाटकातला एक संवाद या कथासंग्रहाच्या निमित्ताने स्मरतो आहे. जगविख्यात मनोविश्लेषक सिग्मंड फ्रायड (ऑस्ट्रेलिया) काय म्हणतात ते पहा " प्रत्येक नातेसंबंधात, मैत्रीच्या, प्रेमाच्या मुळाशी शारीरिक ओढच ही असतेच" (किरणच्या अवशेष या कथेत त्याचा स्पष्ट उल्लेख आहेच) फ्रायडचा हाच सिद्धांत आपणास किरणच्या एकूण सात कथांमध्ये प्रखरपणे प्रत्ययाला येतो.

कितीही नाही म्हंटले तरी काही कथांवर पूर्वसूरींचे संस्कार दिसून येतात. मात्र प्रत्येक कथेतला संदिग्धता कमालीची जपताना, ती संदिग्धता शेवटपर्यंत निभावताना लेखक यशस्वी झाला आहे. कथा वाचताना वाचक संमोहित होऊन जातो आणि पूर्ण वाचल्यावर एक प्रकारचे थकलेपण अनुभवास येते हे नक्की. अपूर्णता हा या कथांचा स्थायीभाव आहे. ही कथाचित्रं सोपी नाहीत मात्र अमूर्त देखील नाहीत. ज्याने त्याने ती फक्त अनुभवावीत. २००० साली कुसुमाकर प्रकाशन यांनी किरणचा 'चौथ्यांच्या कविता' हा कविता संग्रह प्रकाशित केला होता. तेथपासून २०१८ मध्ये प्रकाशित झालेला हा कथा संग्रह. किरणचा हा अठरा वर्षांचा लेखन प्रवास थक्क करणारा आहे.

कथांचे अनोखेपण मी इथे देणार नाही. वाचकांनीच तो अनुभव घ्यावा. तरीही काही कथांमध्ये भावलेल्या धुकंसदृश चित्रांचे सांडलेले रंग वानगीदाखल देत आहे. अगदी शेवटची कथा 'मोराची बायको'. सुरवातीस आपणास ही फॅन्टॅसी कथा वाटेल मात्र त्या अरण्यातील मोरपुरुषाचे आणि तिचे अनोखे नातं आहे. 'साइन आऊट' या कथेमध्ये आदित्य-मृदुला-बिल-

जो आणि शेवटी शर्मा काकू यांच्यामधले अनोख्या संवाद शैलीतले नाट्य आपणास खिळवून ठेवते. एक प्रकारचं उसवलेपण, गुंतागुंत यात आपण ओढले जातो. चॅटिंग या आजच्या परवलीच्या माध्यमातून ही कथा सरकत जाते. 'ती आणि ती' वरूण-सई ही देखील अशीच एक विलक्षण कथा. यात एक संवाद आहे. " पुरुषाला बेडवर सुसंस्कृत स्त्री नकोच असते, तो कितीही म्हणाला तरी, त्याला हवी असते त्याचा अहंकार सुखावणारी, त्याच्या बलदंडपणाला जोजवणारी स्त्री." यावर आपण काय भाष्य करणार? 'अवशेष' या कथेतील राजन-रजनी-तनय-अनघा अशा सुखवस्तू कुटूंबातील प्रत्येकाला सलणारं दुःख कोणते? कोण अधांतर आहे इथे? 'मांदळकरबाई' या कथेतील काव्यात्मकता आणि अभिजात रसिकपणा या कात्रीत सापडलेले अवघडलेपण, वेदना चित्रित केली आहे. 'अमिबा आणि स्टील ग्लास' या वेगळ्या कथेत आजच्या तरुणाईच्या मानसिकतेवर,लैंगिकतेवर चिंतनात्मक भाष्य केले आहे. नायिका म्हणते " मैत्रीचं नातं अमिबासारखं असेल तरंच कायम टिकतं. अमिबा जसा आपल्यात झालेली वाढ स्वतःपासून वेगळी करून त्याला नवा जन्म देतो आणि मोकळं सोडून देतो.. तस्संच.! " मागील वर्षी याच कथेचा

आधार घेत आणि बाईंच्या कवितांचे अभिवाचन सुरवातीस समाविष्ट करीत किरणने 'बाई, अमिबा आणि स्टील ग्लास' नावाचे नाटक रंगभूमीवर आणले आहे. त्याचे प्रयोग मी पाहिलेत.

कविता, कथा, नाटक या सर्व माध्यमात वेगळे प्रयोग करून साहित्य विश्व समृद्ध करणारा, एक वेगळीच अनुभूती वाचकांना प्रदान करणारा आजचा आघाडीचा, महत्वाचा कवी मित्र किरणचा भविष्यकाळ उज्वल आहे. मोराची बायको या पुस्तकाला अनेक महत्वाचे पुरस्कार लाभले आहेत व पुढेही मिळतील. अनेक मान्यवरांनी पुस्तकावर भरभरून लिहिलं आहे, कौतुक केलं आहे. 'मोराच्या बायको' या सशक्त कथासंग्रहाच्या निमित्ताने किरणने साहित्यवर्तुळात एक दमदार पाऊल टाकलं आहे हे नक्की. त्यामुळे किरण कडून वाचकरसिकांच्या अपेक्षा देखील वाढल्या आहेत. त्याही पूर्ण होतील असा विश्वास आहे.

**(मोराची बायको (कथासंग्रह), किरण येले, ग्रंथाली-मुंबई)**

# ३०. ** अस्वस्थ संवेदनाची मूक कविता **




**सांजवात करताना**
**फडफडत राहावी दिव्याची वात**
**आणि दाटून यावे काळजीचे काहूर**
**थकलेल्या डोळ्यांत.**

**किंवा**
**रानात रस्ता चुकलेल्या**
**संध्याकाळी गोठ्याकडे न परतलेल्या**
**वासराची ओढ**
**दाटून यावी गाईच्या पान्ह्यात**
**तशी**
**एक अनामिक कासाविशी**
**उतरत जाते माझ्या खोल आत आत**
**तू निघून गेल्यानंतरही तुझ्या आठवणी**
**बिलगून असतात माझ्या देहामनात**

प्रत्यक्ष काव्यलेखन करण्याच्या विशिष्ट वेळी कवीच्या मनाची काय बरे अवस्था असते? ती तगमग, ती बैचेनी, अस्वस्थता आणि सर्वात महत्वाचे म्हणजे मनोवेदना. या साऱ्या अनामिक वेदना कवीच्या अंतर्मनात महाप्रचंड काहूर उठवून संवेदनांना सारख्या ढुशा मारीत असतात. या संवेदना बाहेरील व्यावहारिक जगाशी कधी पंगा घेत, कधी बंड उभारून त्यांना अटकाव करून कवितेची प्रसूती शक्य तितकी सोपी व्हावी म्हणून प्रामाणिक प्रयत्न करीत असतात. शब्दांचा आश्रय घेऊन कवी कागदावर व्यक्त होत असतानाच एकीकडे

त्याचे मन त्याला खात असते. ते शब्द मला फसवणार तर नाहीत ना? कवी इथे पुन्हा मुका होतो. तात्पर्य काय तर कविता ही मनात सलग आकारली नसेल तर ती कागदावर पण कधीच साकारणार नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक कवीने शब्दांच्या बाबतीत चोखंदळ असायलाच हवे.

**मला पोहचायचे आहे तुझ्यापर्यंत, जसा....**
**मुळांतून हळूहळू सरकत पोहचणारा हिरवा रस**
**पानांच्या देठापर्यंत झिरपत जाणारा एकेक अलवार थेंब**
**फुलांच्या सुगंधापर्यंत,**
**मला पोहचायचे आहे तुझ्यापर्यंत**
**जशी मृत्यूची निर्वाणीची हाक**
**सगळे विझून गेल्यावर उरलेली जीवघेणी राख.!**

सध्या प्रचंड कविता लिहिणाऱ्यांच्या काळात वैचारिक आणि आंतरिक उर्मीमधून काही सकसपणे लिहिणारे खूपच कमी. आपल्या आयुष्याची घुसळण, त्यातली नेमकी वेदना, संवेदना कागदावर थेट उमटवणारे देखील कमी. अशा पार्श्वभूमीवर आपल्या कसदार शब्दकळेने वाचक रसिकांना

एकाचवेळी निःशब्द आणि संमोहित करणारी काही मोजकी कवी मंडळी आपल्या आजूबाजूला व्रतस्थपणे लेखन करीत असतात.

**ही सरत्या वैशाखाची संध्याकाळ**

**नदीकाठच्या गुलमोहराखाली**

**निरोप देताघेता निसटून गेलेली.!**

काळजात सलणाऱ्या दुःखाचे भावविश्व अनोख्या शब्दात टिपणाऱ्या त्या कवितेच्या निर्मात्याला मनोमन सलाम करावासा वाटतो. मुळात कविता हा विषय खूप गंभीर आहे असे मानणारा, अल्पाक्षरी आणि आशयसंपन्न लेखन शैलीची स्वतंत्र नाममुद्रा साहित्य वर्तुळात उमटवणारा एक महत्वाचा कवीमित्र म्हणजे सतीश सोळांकूरकर. " तिन्हीसांजेची भुलावण " हा कवी सतीशचा सहावा कविता संग्रह. २०१८ मध्ये संवेदना प्रकाशन, पुणे यांनी तो प्रकाशित केला. याअगोदर सतीशचे पत्रास कारण की (१९९३), एकांताचा दिवा (२००२), देणेघेणे जीवघेणे (२०१४), सांगण्यासारखं (२०१६), रुजवात...दीर्घ कविता (२०१७) हे पाच कविता

संग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्याचप्रमाणे २००८ मध्ये त्याचा 'सावी' हा लेखसंग्रहही प्रकाशित झाला आहे. कवीमित्र या नात्याने सतीशचा लेखनप्रवास मी जवळून पाहिला आहे. कवीच्या वाढत्या वयाबरोबरच त्याची कविता देखील कशी मोठी होत जाते ते आपणास अनुभवायचे असेल तर सतीशच्या कवितेकडे नक्कीच पहावे. मानसशास्त्र विषयामधली पदवी. सध्या भाभा अणुसंशोधन केंद्र, मुंबई येथे कार्यरत. जनकवी पी. सावळाराम पुरस्कार, दया पवार स्मृती पुरस्कार, अविष्कार सन्मान अशा पुरस्कारांनी सन्मानित. तसेच सतीशच्या कवितासंग्रहांना देखील काही महत्वाचे पुरस्कार लाभले आहेत. त्यातील म.सा. प. चा ह.स. गोखले पुरस्कार, आपटे नगर वाचन मंदिर, इचलकरंजी, कोमसाप- रत्नागिरी, पद्मगंधा प्रतिष्ठान, नागपूर, चैत्रसंवाद पुरस्कार, नाशिक, संजीवनी खोजे पुरस्कार, नगर, हे काही महत्वाचे पुरस्कार. आकाशवाणी मुंबई केंद्रासाठी सतीशने एकांकिका लेखन केले आहे. सतीशच्या अनेक कवितांचा अनुवाद हिंदी, इंग्रजी, कन्नड, तामिळ या भाषांमध्ये झालेला आहे.

मराठी नवकवितेला एक वेगळाच आयाम बहाल करणारे कवी ग्रेस म्हणजे सतीशचे जणू कविताप्रांतातले एक दैवतच. सतीशच्या काही कवितांवर ग्रेस यांच्या शैलीचा प्रभाव आपणाला जाणवतो. सतीशच्या 'एकांताचा दिवा' या दुसऱ्या कविता संग्रहाच्या मलपृष्ठावर खुद्द ग्रेस यांनी आपल्या झोकदार स्वाक्षरीसह सतीशला भरभरून शुभेच्छाही दिल्या आहेत. वेदना असल्याशिवाय संवेदना निर्माण होत नाही आणि ही हुरहूर वाटणारी संवेदना जपणारा हा कवी आपल्या कवितेतून प्रामाणिकपणे वेदना मांडताना दिसतो आहे. ही वेदना चिरंतन अशी आहे. या संग्रहातल्या अनेक कवितांच्या माध्यमातून सतीश आपणाशी अनेक पातळयांवरून संवाद साधतो. सतीशच्या कवितेला गूढतेचे वलय आहे मात्र ती दुर्बोध नाही. सतीशची कविता मानवी मूल्यांचा, नात्यांचा सूक्ष्मतेने शोध घेताना दिसते. कवीला मृत्यूबद्दल, मरणगंधाचे एक सुप्त आकर्षण आहे. मृत्यूच्या पडछायेतल्या अनेक कविता वाचकांना अस्वस्थ करतात. आपल्या आयुष्यावर मायेची पाखर घालणाऱ्या आपल्या आईच्या संदर्भातील काही कविता संग्रहात आहेत. पण त्याही वेगळया पठडीतल्या आहेत. 'वाटणी' आणि 'आई' या कवितेमधून ती आपणाला भेटते.

सतीश सोळांकूरकरची कविता ही मंचीय स्वरूपाची नाही. ती एकांतात रममाण होऊन शांतपणे वाचावी अशी आहे. वरकरणी ती सोपी वाटते, कधीतर असा भासही होतो की आपण कवितेच्या गाभ्यापर्यंत पोचलो आहोत. मात्र तसे होत नाही. अनेक संवेदनशील अनुभूतीचे एकेक पापुद्रे सतीश आपल्याला कवितेतून उलगडून दाखवतो आणि आपण त्या शब्दांच्या अदभूत विश्वात हलकेच गुंतत जातो. संग्रहातल्या एकूण पंचेचाळीस कविता वाचकाचा कधी ताबा घेतात ते कळतच नाही.

**तिला झेंडूच्या बागेची स्वप्नं पडतात रोज**

**केशरी झाक असलेल्या पिवळ्या झेंडूची अपर्याद बाग आणि**

**एक अनवट सुगंध**

**जिच्यावर तिची आणि फक्त तिचीच मालकी असते.**

प्रगल्भ अल्पाक्षरी शब्दांचे वैभव ही सतीशच्या कवितेची खरी ओळख आहे. साध्या, सोप्या संवादात्मक

शैलीतून अनुभूतीचे विश्व साकारणे हे त्याच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. सतीशने आत्तापर्यंत अनेक कवितांच्या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन केले आहे, अनेक कविता त्याने व्यासपीठावरून सादर केल्या आहेत. त्यास वाचक रसिकांचा देखील उत्तम प्रतिसाद लाभला आहे. तरीही सतीशची कविता मला पुस्तकातून गवसते, वेगळे काही सांगू पहाते.

'तिन्हीसांजेची भुलावण' या शीर्षकातच एक प्रकारचे गूढ असे मंतरलेपण आहे. मी तिन्हीसांजेचे संदर्भ शोधले. त्या हुरहूर लावणाऱ्या संध्याकाळचा प्रारंभ अर्थातच पश्चिम दिशेला होतो. पूर्वेकडे अंधार दाटतो. अशावेळी उत्तर आणि दक्षिण या दोन्ही दिशांना मावळतीच्या सूर्यापासून वेगवेगळे रंग प्राप्त होतात आणि काही वेळाने सूर्य पूर्ण मावळल्यानंतर ते रंग, दिशा पश्चिमेत विलीन होतात. त्यामुळे तिन्हीसांजा हा शब्द या तिन्ही दिशांवरून आला असावा. मी स्वतः चित्रकार असल्यामुळे माझ्या डोळ्यासमोर मोठ्या कॅनव्हासवर ती संध्याकाळ आणि ते भुलवणारे एकेक रंग माझ्याशी संवाद करू लागले. सतीशच्या कवितेतले सारे गहिरे रंग क्षितिजापाशी हलकेच जमा झाले आहेत, सोन्याचा तो भडक गोळा हलकेच अस्ताला

निघाला आहे. फांद्यांच्या वळचणीला बसलेली वेंधळी पाखरं उडण्याच्या तयारीत. संध्याकाळच्या सावल्यांचे गडद रंग पाण्यामध्ये उतरले आहेत. तलावाच्या कडेला बसलेला कोणी ध्यानस्थ करुणेची स्तोत्रे गात आहे. त्याच्या आवाजातली वेदना, संवेदना आता अवघ्या अंधाराला कवेत घेत जाते. चित्रकार सतीश भावसार यांनी साकारलेलं मुखपृष्ठ बोलकं आहे. संग्रहाच्या मलपृष्ठावर चितारलेल्या सतीशच्या अस्वस्थ ओळी वाचकाला सुन्न करतात.

**ही अशी तिन्हीसांजेची भुलावण, ही स्मशानशांतता**

**उतरत जाणारी खोल खोल आत**

**ही पहाटवाऱ्याची हाक मुंज्याच्या झाडाजवळून**

**ही बांधाबांध, आवराआवर**

**हे स्वतःहून निसटून जाणे अलवार...कुठून - कुठे?**

**(तिन्हीसांजेची भुलावण (कवितासंग्रह), सतीश सोळांकूरकर, संवेदना प्रकाशन, पुणे)**

# ३१. समृद्ध जगण्याचं तंत्र व मंत्र: मजेत जगावं कसं?




**पेला अर्धा सरला आहे**
**असं सुद्धा म्हणता येतं ;**
**पेला अर्धा भरला आहे**
**असं सुद्धा म्हणता येतं!**

**सरला आहे म्हणायचं**
**कि भरला आहे म्हणायचं?**
**तुम्हीच ठरवा!**

**सांगा कसं जगायचं?**
**कण्हत कण्हत**
**कि गाणं म्हणत?**
**तुम्हीच ठरवा!**

कविश्रेष्ठ मंगेश पाडगावकर यांची 'बोलगाणी' या कवितासंग्रहातील गाजलेली कविता आठवतीय का? जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिल्यास रोज भेडसावणाऱ्या अनेक प्रश्नांची उकल होऊ शकते आणि जगणं आनंददायी होऊ शकते. याचप्रमाणे राजकवी भा. रा. तांबे यांच्या लोकप्रिय ठरलेल्या गीताच्या या ओळी पहा.

**ये बाहेरी अंडे फोडुनि... शुद्ध मोकळ्या वातावरणी,**
**का गुदमरशी आतच कुढुनी?**
**रे मार भरारी जरा वरी..**
**घन तमी शुक्र बघ राज्य करी,**
**रे खिन्न मना, बघ जरा तरी!**

वाचक रसिकांनो. मी तर म्हणेन नैराश्याने पछाडलेल्या प्रत्येक व्यक्तीने या दोन कवितांचे नुसते मनन, चिंतन केले ना तरी त्यांना जगण्याचा आणि आनंदाचा मार्ग सहज गवसेल. प्रयोग करून पहायला काय हरकत आहे? असो. अगदी असेच प्रचंड सकारात्मक आणि आनंददायी विचारांनी काठोकाठ भरलेले एक पुस्तक माहितीय? लेखक शिवराज गोर्ले यांचे 'मजेत जगावं कसं' हे सर्वांगसुंदर पुस्तक. राजहंस प्रकाशन यांनी २००४ मध्ये प्रकाशित केलेल्या या पुस्तकांच्या अनेक आवृत्या निघाल्या, निघत आहेत. आजचे विश्व विविध स्पर्धांनी, समस्यांनी, ताण-तणावांनी व्यापले आहे. जगण्यासाठी, सुखासाठी जो तो जीव तोडून धावत आहे, कित्येक वेळेस तर त्याचे ध्येयच ठरलेले नसते, आपणाला काय बनायचे आहे हेही ठरले नसते, फक्त आणि फक्त पळायचे, दमायचे आणि एके दिवशी डॉक्टरांच्या अथवा हॉस्पिटलच्या स्वाधीन व्हायचे. उत्तम जगण्यासाठी नोकरी अथवा एखादा व्यवसाय करणे अत्यावश्यकच आहे. मात्र ही नोकरी अथवा हा व्यवसाय हेच आपले आयुष्य, तेच आपले अंतिम ध्येय असे जर कोणी ठरवले तर? तर मात्र सारंच अवघड होईल. अवघं आयुष्य बेचव, निरस होईल. सध्याच्या धकाधकीच्या काळात

'निर्भेळ आनंद' हा शब्दच दुर्मिळ झाला आहे. आपल्या सभोवती निरखून पाहिल्यास अगदी साध्या साध्या गोष्टींमध्ये आनंद भरलेला असतो, तो आनंद कवेत घेण्यासाठी मात्र आपल्यापाशी दृष्टी हवी. पुन्हा हा आनंद स्वतः अनुभवताना आपल्या मित्रपरिवारांना, सगेसोयऱ्यांना मुक्तहस्ताने वाटून टाकल्यास तोच आनंद पुन्हा दुप्पटीने तुमच्यापाशी येईल. खरं ना? या दुर्मिळ आनंदाचा प्रसन्न ठेवा वाचक रसिकांना वाटण्यासाठी लेखक शिवराज गोर्ले हे सिद्ध झाले आणि आपल्या पुस्तकातून आपल्याशी सहजपणे गप्पा मारता मारता, कुठल्याही प्रकारचे तत्वज्ञान सांगण्याचा अथवा मार्गदर्शन करण्याचा आव न आणता साध्यासुध्या व्यावहारिक गोष्टींमधून, अनेक हलक्याफुलक्या किश्शांची मुक्त पखरण करीत आयुष्यातील मजेचं मर्म खुमासदार पद्धतीने उलगडून दाखवलं आहे. मराठी साहित्य विश्वात अशा प्रकारचे, अशा विषयाचे हे सुंदर पुस्तक बहुदा एकमेव असावे.

या सुंदर पुस्तकाचा आनंदी मूड मुखपृष्ठावर छानसा पसरला आहे. कॉर्पोरेट क्षेत्राला कायमचा रामराम करून पूर्णवेळ लेखनाकडे वळणाऱ्या गोर्ले यांनी नाटक, चित्रपट,

टीव्ही सिरिअल, कथा, कादंबरी, ललित लेख, स्तंभलेखन अशा सर्व प्रांतात मुशाफिरी केली.. सदर पुस्तकातील प्रस्तावनेत लेखक महाशय म्हणतात " यशाचं काही 'तंत्र' असतं का? आनंदाचं काही 'रहस्य' असतं का? प्रेमाचा काही 'फॉर्म्युला' असतो का? सुखासमाधानानं जगण्याची काही 'युक्ती' असते का? ही अशी तंत्र, रहस्य, युक्त्या सांगणाऱ्या साहित्याला इंग्रजीत 'सक्सेस लिटरेचर' म्हंटलं जातं. प्रतिवर्षी अशी शेकडो पुस्तकं, जुन्या पुस्तकांच्या आवृत्त्या प्रकाशित होतात आणि त्याच्या लाखो प्रती जगभर खपतात. सुखी, समृद्धी, संपन्न जीवनाची बदलत्या काळाशी सुसंगत अशी सूत्रं मांडणारं इंग्रजी साहित्य वाचताना मनाशी एक प्रश्न सतत येत असे की आपल्याकडे हे असं काहीच का लिहिलं जात नाही? काहीच का सांगितलं जात नाही?यावर उत्तर मिळालं की आपल्याकडे जे आहे ते प्रेरिक साहित्यापेक्षाही कितीतरी उच्च पातळीवरचं आहे. ते म्हणजे आपलं अध्यात्म! मात्र यश, वैभव, सुख, आनंद मिळवण्यासाठी आपलं सगळं अध्यात्म, आपले आदर्श गुंडाळून ठेवण्याची गरज नाही. चांगली तत्वं, आणि मूल्यं यांची फारकत न घेता शांती आणि समाधान न गमावताही आपण आयुष्यात आपल्याला हवं ते मिळवू शकतो

आणि अगदी मस्त, मजेत जगू शकतो असा माझा विश्वास आहे. हे पुस्तक म्हणजे त्या दिशेनं केलेला थोडा वेगळा, कदाचित थोडा धाडसीही, पण खुपसा प्रामाणिक प्रयत्न आहे."

अरे संस्कार संस्कार, तुमचे विचार...तुमची वृत्ती, तब्येतीनं जगा!, आनंदाचं रहस्य, यशाचं तंत्र व मंत्र, पैसे कसा कमवावा?, प्रेम कसं मिळवावं? मानसिक अडथळे, अंतर्मनाची अमर्याद शक्ती अशा विविध परिशिष्टामधून लेखकाने वेगवेगळे दाखले, उदाहरणे, किस्से तसेच उपयुक्त, रंजक माहिती देत वाचकांशी सुरेल संवाद साधला आहे. लेखकाची लेखनशैली ही सहज, संवादमय, साधीसोपी असल्यामुळे वाचक पुस्तकात हलकेच गुंतून जातो आणि एखाद्या शुष्क, कोरड्याठक्क पडलेल्या विहिरीमध्ये अचानक झरे फुटावेत आणि ती विहीर थंडगार पाण्याने तुडुंब भरून जावी अशी स्थिती वाचकाची काहीशी होते हे नक्की. या पुस्तकात तर ठिकठिकाणी आनंदाचे, प्रसन्नतेचे अनेक झरे अनुभवायला मिळतात.

संपूर्ण पुस्तकाचा धांडोळा घेणं केवळ अवघड आहे. कुठलंही पान उघडा आणि आनंदाच्या प्रसन्न लहरींमध्ये चिंब भिजून जावं इतकं हे पुस्तक आपल्याला भिडतं. काही उदाहरणं

वानगीदाखल देतोय. जन्मात:च अंध,मुकी, बहिरी असूनही आनंदी आयुष्य जगणारी हेलन केलर, गलितगात्र अवस्थेतही अंतराळातल्या कृष्णविवरांचा वेध घेणारे आणि खुर्चीला खिळूनही जगभर भ्रमण करणारे शास्त्रज्ञ डॉ स्टीफन हॉकिंग्ज, लाकडी पाय वापरून डौलदार नृत्यात रममाण होऊन प्रसन्न मुद्रेची सुधा चंद्रन, स्वतः अपंग असूनही सहकाऱ्यांच्या मदतीने यशस्वी भव्यदिव्य उद्योग उभारणारे विस्कार्दी असे अनेक जण. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून केवळ जिद्दीने जीवनात उभे राहून आनंदाने आयुष्याला सामोरे जाणारी ही मंडळी पाहिली की यांच्यापुढे आपली दुःखे तर काहीच नाहीत याची प्रचिती येते. मजेत जगावं कसं हे शिकण्यासाठी दोन गोष्टी जमायला हव्यात. एक म्हणजे... आहे त्यात आनंदानं जगणं आणि दोन म्हणजे... आयुष्यात हवं ते मिळवणं. प्रेमाबद्दल लेखक काय म्हणतो ते पहा. खरं प्रेम हे बिनशर्त असतं, प्रेम म्हणजे मालकी हक्क नव्हे, बांधून ठेवतं तेही प्रेम नव्हे, मागून मिळतं तेही प्रेम नव्हे. मजेत जगण्यासाठी सर्वप्रथम नकारात्मक भावनांचा अडथळा दूर करणे क्रमप्राप्त आहे. प्रचंड इच्छाशक्तीच्या जोरावर अडचणींचे पर्वत सहज ओलांडता येतात. पैसा नसणं हेच सगळया अनर्थाचं मूळ आहे. आयुष्यभर

तुम्हीच पैशासाठी काम करू नका, पैशालाच तुमच्यासाठी कामाला लावा! दाम करी काम! आनंद हीच यशाची पायरी असते. सदैव वर्तमानात जगणं म्हणजे आनंदात राहणं . पैशानं आनंद विकत घेता येत नसतो. खरा आनंद विकाऊ नसतोच. टिकाऊ असला तरच तो खरा आनंद.

पुस्तकातली ही मौक्तिके वाचकाला अंतर्मुख करतात. पुस्तकाच्या शेवटी संदर्भग्रंथांची यादी दिली आहे यावरून लेखकाने हे पुस्तक साकारण्यासाठी किती प्रचंड मेहनत घेतली आहे हे कळतं . आजच्या अस्थिर, क्षणभंगुर काळात माणूस निर्भेळ हसायला आणि मजेत जगायला विसरून गेलाय. हे पुस्तक वाचणारा माणूस कितीही गंभीर वृत्तीचा असू दे त्याच्या चेहऱ्यावर उमटणारी आनंदाची, प्रसन्नतेची रेष हेच या पुस्तकाचं खरं फलित आहे.

**(मजेत जगावं कसं? (वैचारिक), शिवराज गोर्ले, राजहंस प्रकाशन, पुणे)**

# ३२.** संवादकांच्या अनोख्या भावविश्वात **




काही वर्षांपूर्वी गडकरी रंगायतन येथे 'त्रिदल' नावाचा अभिनव कार्यक्रम आयोजित केला होता. त्यामध्ये सुप्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ, आजच्या आघाडीच्या निवेदिका,

निरुपणकार धनश्री लेले आणि आजच्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारे उत्तम निवेदक, अभिनेते विघ्नेश जोशी यांच्या मनमोकळ्या गप्पांचा कार्यक्रम आयोजकांनी ठेवला होता. निवेदकांच्या तीन पिढ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या निवेदकांनी आपला प्रारंभीचा कष्टमय प्रवास, अनेक किस्से, आठवणी, विविध क्षेत्रातील दिग्गज मंडळींचा झालेला परिचय, त्यांना बोलते करताना आलेला अनुभव, त्यातून गवसलेलं शहाणपण, इत्यादी गोष्टींचा परिचय गप्पांच्या आवर्तनातून रसिकांना झाला. त्या अनोख्या स्मरणरंजनात रसिक जणू दंग झाले. नोकरी-व्यवसाय सांभाळून आत्तापर्यंत मी विविध सांस्कृतिक, सांगीतिक कार्यक्रमांना मी एक रसिक नात्याने उपस्थित राहिलो आहे. अनेक दिग्गज कलाकारांनी सादर केलेले विविध अविष्कार 'याची देही याची डोळा' पाहण्याचे सदभाग्य मला लाभले. हे सर्व अविष्कार पाहताना आपली कला सादर करणाऱ्या कलाकारांबरोबरच एका व्यक्तीचे अप्रूप मला नेहमी वाटत आलं आहे. ती व्यक्ती म्हणजे निवेदक, सूत्रसंचालक किंवा मुलाखतकार. आयोजकांची सारी भिस्त जशी कलाकारांवर तशीच या निवेदकांवर देखील असते. या साऱ्या कलाकारांची मोट बांधणे, दिलेल्या वेळेचे अचूक

नियोजन करून त्या त्या कलाकारांना व्यक्त होण्यासाठी पुरेसा कालावधी देणे, रसिक आणि कलाकारांमध्ये सुसंवादाचं नातं प्रस्थापित करून कार्यक्रमाची रंजक वाढवणे. स्वतःकडे दुय्यम भूमिका घेऊन त्या कलाकाराला जास्त वाव देणे इत्यादी सारी व्यवधानं या निवेदक नामक व्यक्तीला जाणीवपूर्वक सांभाळावी लागतात. कधी कधी असेही होते एखाद्या आमंत्रित कलाकाराचे सादरीकरण अगदीच निस्तेज वाटू लागते. मात्र निवेदकाच्या खुशखुशीत निवेदनामुळे त्या कार्यक्रमात जान येते, वाचकांना तो कार्यक्रम कंटाळवाणा वाटत नाही. किंवा असेही होते सारा कार्यक्रम तो कलाकार आपल्या सशक्त सादरीकरणानं उंचीवर नेतो, त्यापुढे निवेदकाचे कंटाळवाणं निवेदन फिकं पडतं.

अशाच पार्श्वभूमीवर आपल्या ठाण्यातल्याच प्रा. श्री अशोक चिटणीस आणि डॉ शुभा चिटणीस या लेखक दाम्पत्यांचे एक अप्रतिम पुस्तक वाचनात आले. पुस्तकाचं शीर्षकच मुळी 'संवाद संवादकांशी' असं आहे. ठाण्याच्या व्यास क्रिएशन्स यांनी हे पुस्तक २०१२ मध्ये प्रकाशित केलं आणि त्यास रसिकांचा भरभरून प्रतिसाद लाभल्याने गेल्या

सहा वर्षांत पुस्तकाची पाचवी आवृत्ती प्रकाशित झाली. पुस्तकाचं वेगळंपण हे आहे की यापूर्वी विविध क्षेत्रातील कलाकारांच्या जीवन प्रवासावर अनेकांनी भरभरून लिहिलं आहे मात्र या साऱ्या कलाकारांना बोलतं करणाऱ्या आणि काहीशा उपेक्षित ठरलेल्या निवेदकांच्या कार्यकर्तृत्वावर मात्र जास्त लिहिलेलं आढळत नाही. स्वतः उत्तम निवेदक असलेल्या प्रा. चिटणीस सरांनी नेमका हाच विषय निवडून अनेक निवेदकांना प्रत्यक्ष भेटून, त्यांच्याशी गप्पा मारून, संदर्भ गोळा करून त्यांच्या निवेदनाचा प्रवास, अनुभव, किस्से शब्दबद्ध केले आहे. हे मोलाचे कार्य रसिकवेड्या, व्यासंगी, आणि उत्साही चिटणीस दाम्पत्यांनी अतिशय रसिकतेने आणि चोखपणे केले. त्या दोघांचे मनापासून अभिनंदन. फक्त आणि फक्त निवेदकांच्या जीवन प्रवासावरचे एक मराठीतले एकमेव पुस्तक असावं त्याबद्दल व्यास क्रिएशन्सला देखील धन्यवाद.

कथालेखक, चरित्रलेखक श्री अशोक चिटणीस यांची एकूण चौतीस पुस्तके प्रकाशित आहेत. सहाशेच्या वर कथाकथनाचे कार्यक्रम. ठाण्याच्या डॉ बेडेकर विद्यामंदिर इथे तीस वर्षे मुख्याध्यापक. १९८३ मध्ये आदर्श शिक्षक म्हणून

राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार. आज वयाच्या ८१ व्या वर्षी देखील ते सतत कार्यमग्न असतात. डॉ शुभा चिटणीस. ठाणे कॉलेज आणि मुंबई विद्यापीठात पंचवीस वर्षे हिंदी विषयाचे अध्यापन केले. त्यांचीही एकूण २९ पुस्तके प्रकाशित. अनेक संस्थांचे पुरस्कार लाभलेत. अनेक कार्यक्रमांना आवर्जून उपस्थित राहणाऱ्या या दांपत्यांच्या चेहऱ्यावर तरळणारी ऊर्जा, उत्साह आपल्याला थक्क करतो.

एकूण बावीस दिग्गज निवेदकांच्या आठवणींचा, किस्स्यांचा, कार्यकर्तृत्वाचा कॅनव्हास या पुस्तकात शब्दबद्ध केला आहे. आणखीन एक अभिमानाची बाब म्हणजे या बावीस निवेदकांमध्ये नऊजण हे पक्के ठाणेकर आहेत.

सुधीर गाडगीळ, मंगला खाडिलकर, अरुण नूलकर, शैला मुकुंद, प्रदीप भिडे, भाऊ मराठे, नीला रवींद्र, मधुकर भावे, प्रवीण दवणे, धनश्री लेले, अरुण म्हात्रे, वासंती वर्तक, नरेंद्र बेडेकर, उत्तर मोने, संपदा जोगळेकर-कुलकर्णी, हेमंत बर्वे, समीरा गुजर-जोशी, प्रसन्न जोशी, ज्योती अंबेकर, डॉ महेश केळुस्कर, वसुंधरा काशीकर-भागवत, अशोक हांडे.

निवेदनाच्या अनोख्या विश्वातली ही एकेक लखलखती नक्षत्रंच.

एकेका निवेदकांची नुसती नावे वाचली तरी निवेदनाच्या विश्वात त्यांनी केलेलं भरीव कार्य, कर्तृत्व, त्यांचा आवाज, त्यांचे कार्यक्रम डोळ्यासमोर झरकन तरळू लागतात. पुस्तकाच्या प्रारंभी श्री अशोक चिटणीस सर आपल्या मनोगतात काय म्हणतात ते जाणून घेऊया. "हे पुस्तक मी माझी पत्नी डॉ शुभा हिने मिळून लिहिलं आहे. तिचे सहकार्य मोलाचे आहे. आमच्या मुग्धाने इयत्ता पाचवीपासून अनेक कार्यक्रमात सूत्रसंचालिका म्हणून भूमिका करण्यास प्रारंभ केला. त्याच मुग्धाच्या सोळाव्या स्मृतिदिनी हे पुस्तक प्रकाशित झाले. मुग्धा या जगात आहे, ती विविध क्षेत्रातील गुणवंतांत आहे, या भूमिकेतूनच तर आमचे हे लेखन चालू आहे. त्यामुळे प्रत्येक निवेदकात आम्हाला आमची मुग्धा दिसली."

या पुस्तकातील प्रत्येक निवेदकाच्या कार्यकर्तृत्वावर इथे लिहायचं म्हंटलं तर कमीतकमी दहा-बारा पाने लिहावी लागतील आणि ते केवळ अशक्यच आहे. त्यापैकी मुलाखतीत गवसलेले काही जणांचे, अनुभवाचे बोल जाणून घेऊया.

निवेदकांच्या अनोख्या दुनियेतले जानेमाने नाव म्हणजे ज्येष्ठ मुलाखतकार सुधीर गाडगीळ. चिटणीस सरांनी त्यांची मुलाखत ही तीन-चार टप्प्यात घेतली. सांगण्यासारखं भरपूर काही. आत्तापर्यंतच्या विविध कार्यक्रमांचा उत्तम रेकॉर्ड करून ठेवणारे सुधीरजी काय म्हणतात ते पहा "

" सर्वप्रथम मुलाखतकार वा निवेदकानं स्वतःकडे दुय्यम भूमिका घ्यायला हवी. आपण दुय्यम आहोत हा भाव सतत मनात हवा. कार्यक्रमातील आपण वक्ते व प्रमुख पाहुणे नाही आहोत, हे ध्यानी ठेवायला लागतं. ज्यांची मुलाखत घ्यायची त्याला वा त्यांना नीट समजून घ्यायचं असतं. बोलणाऱ्याचा स्वभाव, आणि ऐकणाऱ्याची मानसिकताही लक्षात घ्यायची असते. ज्याची मुलाखत घ्यायची त्याचा स्वभाव, त्याची जडणघडण, त्याचा बायोडेटा, मुलाखतकाराला नीट माहिती हवा. निवेदक म्हणून वा मुलाखतकार म्हणून मी माझ्या मनाशी पाच सूत्रं निश्चित केली आहेत. निवेदकाकडे विचारांची स्पष्टता सर्वप्रथम हवी. दुसरी गोष्ट म्हणजे शब्दनिवडीत सुसूत्रता हवी. तिसरी गोष्ट म्हणजे त्याच्या शब्द मांडणीत अनौपचारिकता

हवी. चौथे सूत्र म्हणजे, क्वचित प्रसंगी दाखवावी लागणारी उत्स्फूर्तता हवी!"

निवेदनाला वन्समोअर घेणाऱ्या आजच्या आघाडीच्या लोकप्रिय निवेदिका, लेखिका, निरुपणकार सौ धनश्री लेले इथे म्हणतात " निबंध लेखनाच्या सवयीनं मला आता कोणत्याही कार्यक्रमाचं निवेदन करताना बांधेसूद प्रारंभ, मुद्देसूद विवेचन, बोलणं आणि आकर्षक समारोप करता येतो. माझ्या व्यक्तिमत्वावर आजोबांचा नव्वद टक्के इम्पॅक्ट आहे. उत्तम निवेदनाचं सारं श्रेय मी आजोबांनाच देते. आजोबांमुळे संगीताचा कान तयार झाला. सकाळी लवकर उठून पाठांतर करणं, लेखन करणं याची शिस्त आजोबांनी लावली."

अनेक मैफिलींचे, कार्यक्रमांचे निवेदन करणारे सुप्रसिद्ध कवी, गीतकार, व्याख्याते श्री प्रवीण दवणे म्हणतात " श्रोत्यांची संवेदनाक्षम पातळी उंचावणं हे निवेदकाचं काम असतं. निवेदकाने केवळ माहितीपर बोलू नये. त्याच्या बोलण्यात चिंतन हवं, गृहपाठ हवाच, उत्स्फूर्तता हवी, वाचन हवं."

प्रसन्न व शालीन व्यक्तिमत्वाच्या सुप्रसिद्ध निवेदिका सौ मंगला खाडिलकर म्हणतात " संस्कृत भाषेची नादवळणं, शब्दांमधले महाप्राण आणि बोलण्यातले आरोह-अवरोह मनात इतके रुजले की मराठी-हिंदी निवेदनातही त्याचा चांगला उपयोग झाला. याच संस्कृत भाषेने मनाची रसिकता, संवेदनशीलता व सौंदर्यदृष्टी वाढवली. पुढे आकाशवाणी आणि दूरदर्शन माध्यमात मी आनंदाने गुरफटून गेले."

आज निवेदन, सूत्रसंचालन क्षेत्रात प्रचंड संधी आहे आणि तितकीच स्पर्धाही आहे. 'अभ्यासोनी प्रकटावे' असे समर्थांनी म्हंटलंच आहे. तेव्हा निवेदनाच्या क्षेत्रात उतरताना हा अभ्यास हवाच. आणि त्यासाठी हे मौलिक पुस्तक उद्याच्या निवेदकाच्या संग्रही हवेच. नाही का?

**(संवाद संवादकांशी (व्यक्तिपर लेखसंग्रह), अशोक चिटणीस व डॉ शुभा चिटणीस, व्यास क्रिएशन्स, ठाणे)**

# ३३. ** आठवणींचा विलोभनीय लोलक **




" आपण सिमेंट कॉँक्रीटच्या सान्निध्यात राहात असलो तरी, पहिला पाऊस पडला की, दूरवरच्या डोंगरदऱ्यातून वाऱ्यासोबत येणाऱ्या मृदगंधाचा दरवळ आपल्याला सुखावून

जातो. हा मृदगंध म्हणजे निसर्गदत्त देणगी आहे. मनाला हरखून टाकणारा मातीचा गंध, दरवळ. माझं बालपण खेड्यातलं. मी, आमच्या घराच्या ओट्यावर बसून जो मृदगंध बालपणी अनुभवला, अगदी तस्साच्या तस्साच मृदगंध मुंबई शहराच्या परिसरात, आजही अनुभवतो. जणु आपल्या आवडीचं एखाद्या कुपीत जपून ठेवलेलं अत्तर!"

या संवेदनशील कवी, संपादकाचे वास्तव्य सध्या मुंबई सारख्या महानगरात असले तरी त्यांचे मन आपल्या गावातल्या निसर्गरम्य गावात, पंचक्रोशीत पाखराच्या रूपानं भिरभिरत असतं. लहानपणीचे प्रसंग, त्यावेळचा निसर्ग, आईबाबा, सगेसोयरे, नातीगोती या साऱ्या अवकाशात हे संपादक महोदय मनोमन रमतात. लक्ष आठवणींच्या धुक्यात ते हरवून जातात, तर कधी भावव्याकुळ होतात. हे व्याकुळ क्षण कवितेच्या रूपानं अलगद कागदावर उमटतात.

**तशाच पडती श्रावणधारा**
**इंद्रधनुच्या गोफामधून**
**नदी काठचा अवखळ वारा**
**सप्तरंगात वाहे मिसळुन**

**तशीच उगवे निळ्या अंबरी**
**चंद्राची ती कोर बिलोरी**
**तशीच डुलते वेडी कमळण**
**तळ्यात वेचित निळे चंद्रकण**

**तिन्हिसांजेला कातरवेळी**
**साद कुणाची येते अवचित**
**गावकुसाच्या वाटेवरला**
**वड म्हातारा होतो कंपित**

गेली चाळीस वर्षे व्रतस्थपणे लेखन करणारे, अनेक दिग्गज साहित्यिकांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेले आणि पाठीशी मनुष्यबळ, आर्थिकबळ नसताना केवळ साहित्याच्या विलक्षण प्रेमापोटी, ध्यासापोटी 'कुसुमाकर' सारखे दर्जेदार मासिक निष्ठेने चालवणारे कवी, लेखक, संपादक, आस्वादक श्री श्याम पेंढारी यांचा नुकताच 'लोलक' हा लेखसंग्रह वाचायला मिळाला. २६ जानेवारी २०२१ रोजी जेके मीडिया, ठाणे यांनी तो प्रकाशित केला आहे. पेंढारी सर आणि 'कुसुमाकर' हे एक अबोध नातं आहे. महाराष्ट्रातील अनेक जुन्या-नव्या लेखक-कवी मंडळींना हक्काचं व्यासपीठ बहाल

करणारे पेंढारी सर म्हणजे एक विद्यापीठच आहे. त्यांच्यापाशी आठवणींचे, अनेक किस्स्यांचे मोठे गाठोडे आहे. विविध लेखांच्या माध्यमातून वाचकांसाठी ते गाठोडं वेळोवेळी रिकामं करीत असतात. गेल्या सात-आठ वर्षांपासून 'कुसुमाकर' या मासिकाशी माझं नातं अधिकाधिक दृढ झालं.. कधी कविता, कथा तर कधी मुखपृष्ठ यांच्या माध्यमातून पेंढारी सरांशी मी जोडलो गेलो ते कायमचा. २००० ते २०१९ असा वीस वर्षांचा कुसुमाकरचा प्रवास थक्क करणारा आहे. प्रकृती अस्वास्थामुळे पेंढारी सरांनी कुसुमाकरचा प्रवास सर्वांच्या सहमतीने थांबवला. डिसेंबर २०१९ चा निघालेला कुसुमाकरचा शेवटचा अंक. याच कुसुमाकर मासिकात २०१३ ते २०१९ या कालावधीत पेंढारी सरांनी 'लोलक' या शीर्षकांतर्गत विविध लेख लिहिले. त्या लेखांचा हा संग्रह म्हणजेच 'लोलक'.

पेंढारी सर म्हणतात " लोलक' हे शीर्षक माझ्या बालपणीच्या आठवणींना उजाळा देणारं आहे." आणि ते खरेही आहे. या पुस्तकात एकूण बत्तीस लेख आहेत. हे पुस्तक वाचताना वाचकाला लक्ष आठवणींचा मृदगंध पुस्तकाच्या

पानापानात जाणवतो वाचकही त्यात रमून जातो. पेंढारी सरांची लेखन शैली साधी, सोपी आणि नेमकी असून ती ललित शैलीच्या अंगाने जाणारी आहे. ढोबळमानाने या पुस्तकातील लेखांचे चार भाग करता येतील. गावाकडच्या रम्य आठवणी, नातीगोती, निसर्गाचे आविष्कार (विशेषतः पावसाची रूपं), आणि व्यक्तिचित्रण.

पेंढारी सरांचा जन्म २९ जुलै १९४८ रोजी रायगड जिल्ह्यातील 'आडी' (तालुका-श्रीवर्धन व म्हसळा) या लहान गावातील एका शेतकरी कुटुंबात झाला. वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत ते गावी होते. पुढे शिक्षणाच्या निमीत्ताने ते मुंबईला आले. या पुस्तकातील 'आनंदाचे झाड' या पहिल्याच लेखातून वाचकाला त्यांच्या गावाकडचा निसर्ग, जुने घर, आईने केलेले संस्कार, तिथली माणसं, चालीरीती, याबद्दलच्या अनेक आठवणी वाचायला मिळतात. तर पुढील लेखातून म्हणजेच 'निनावी नदी', 'देऊळ', 'रानमेवा', या लेखातून गावाकडचे अनेक संदर्भ, निसर्गाचे अविष्कार आपल्याला अनुभवायला मिळतात. 'भाऊबंदकी' लेखातून गावातल्या दोन भावांमधला

विसंवाद वाचायला मिळतो आणि आपण अस्वस्थ होतो. मुंबईला आल्यावर खऱ्या अर्थाने पेंढारी सरांना साहित्याची, वाचनाची गोडी लागली. 'श्यामची आई' या पुस्तकाने त्यांना झपाटून टाकलं . त्यांच्या लेखनाचा प्रारंभ कविता लेखनाने झाला आणि पुढे कथा, कादंबरी या माध्यमांमध्येही ते लिहू लागले. अनेक सांस्कृतिक, सामाजिक संस्थांशी ते जोडले गेले. १९७९ पासून प्रथम अक्षरचळवळीत ते सहभागी झाले. १९८२ पासून त्यांनी 'प्राजक्त' हा दिवाळी अंक प्रकाशित करण्याचे ठरवले. त्या साऱ्या आठवणी त्यांनी 'आठवणीतलं अलिबाग' या लेखात शब्दबद्ध केल्या आहेत. पेंढारी सरांचा साहित्यप्रवास सुरूच होता. पुढे झपुर्झा (त्रैमासिक) साठी काम पाहिले आणि नंतर २००० मध्ये 'कुसुमाकर' मासिकाच्या निर्मितीत ते मनापासून रमले. वीस वर्षे या अंकांचे काम करताना अक्षरशः ते तहान-भूक विसरून दंग झाले होते. विशेष म्हणजे पेंढारी सर एम. टी. एन. एल. मधली नोकरी सांभाळून ते कुसुमाकरचे काम पहात होते. तेथे चौतीस वर्षाची सेवा करून २००५ मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली आणि. स्वतःला साहित्यसेवेमधे झोकून दिलं. अनेक मान्यवरांनी, प्रस्थापित आणि नवोदितांनी कुसुमाकरवर मनापासून प्रेम केलं. मात्र

प्रकृतिअस्वास्थामुळे २०१९ मध्ये कुसुमाकर त्यांना नाईलाजाने बंद करावे लागलं.

कुसुमाकर मासिकाच्या जडणघडणीमध्ये, प्रवासामध्ये पेंढारी सरांना अनेकांचे मार्गदर्शन लाभले, अनेकांनी मोलाचे सहकार्यही केले. या काळात दिग्गज व्यक्तिमत्त्वांचा परिचय आणि भेटीगाठी झाल्या. अशा सर्व मान्यवरांच्या आठवणी त्यांनी अनेक लेखातून जागवल्या आहेत. संगीतकार पं. यशवंत देव, आनंदयात्री कविश्रेष्ठ मंगेश पाडगावकर, गजलकार सदानंद डबीर, चित्रकार, कवी प्रा. षांताराम पवार, ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग जाधव, कवितारतीचे संस्थापक, संपादक पुरुषोत्तम पाटील, ज्येष्ठ साहित्यिका लीलाताई शहा, हस्ताक्षर संग्राहक श्री चंद्रकांत कोकीतकर, यांच्यावरचे सगळेच लेख वाचनीय. त्याचप्रमाणे 'वर्ष अठरावे' लेखातून सरांनी कुसुमाकरच्या प्रवासात मोलाची साथ आणि प्रोत्साहन देणारे, शिरीष पै, शंकर वैद्य, आकाशानंद, आ. ना. पेडणेकर, डॉ राम पंडित यांचेविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. बालकवींच्या 'गर्द सभोवती रान साजणी तू तर चाफेकळी' अशी नितांतसुंदर कवितेचं केलेलं

रसग्रहण आणि 'नुसते लढ म्हणा' ही कुसुमाग्रजांच्या अजरामावर कवितेवर सरांनी केलेलं भाष्य वाचण्यासारखं. आजपर्यंत पेंढारी सरांनी कविता, कादंबरी, ललित यामध्ये लेखन केले आहे. त्यांची प्रकाशित पुस्तके : कवितासंग्रह : प्राजक्त, मातीचे घर, मैत्रीचा गाव. कादंबरी: वळणावरती, ललितलेख संग्रह : भेटीगाठी, कंदील. याशिवाय काही पुस्तकं सध्या प्रकाशनच्या वाटेवरती आहेत.

'लोलक' या त्यांच्या सातव्या पुस्तकाला कवयित्री, लेखिका अनुराधाताई नेरुरकर यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली आहे. प्रस्तावनेतून त्या आपल्याशी संवाद साधतात." लेखकाच्या मनात जपून ठेवलेल्या लोलकावर आठवणींचे किरण पडल्यावर ते अनेकरंगी स्मृतीशलाकांच्या स्वरूपात अवतीर्ण झालेले आहेत. वाचकांनाही हे लेख वाचताना याचा प्रत्यय आल्याशिवाय राहाणार नाही." चित्रकार सतीश भावसार यांनीं रेखाटलेलं चित्र मुखपृष्ठासाठी साजेसं आहे. जे के मीडिया (कवयित्री ज्योती कपिले) यांनी सजवलेली पुस्तकाची मांडणी, बांधणी उत्तम, दर्जेदार.

१९८९ मध्ये प्रकाशित झालेल्या सरांच्या 'प्राजक्त' या कविता संग्रहातल्या ओळी स्मरतात. शब्दांशी असलेलं हे नातं अक्षय राहो.

**शब्द नाते जोडणारे, नाते तोडणारे शब्द**

**आयुष्याच्या आभाळात, कधी स्तब्ध**

**कधी कडकडाट करणारे, खडाष्टक शब्द**

**शब्द बोचणारे, सलणारे, छळणारे**

**शब्द तीक्ष्ण टोकाचे, ह्रदयाला आरपार छेदणारे**

**शब्द लोण्याच्या सायीचे, ह्रदयाला पाझर फोडणारे**

**शब्द मिठास वाणीचे, भुरळे शब्द**

**बेसावध हरिणीला फसवणारे शब्द**

**शब्द शब्दांचे.... शब्दांचे शब्द**

**---अर्निबंध.!**

**(लोलक (लेखसंग्रह), श्याम पेंढारी, जे के मीडिया, ठाणे)**

# ३४. ** लालित्यपूर्ण अक्षरांची नादवलये




" सर्वप्रथम कविता नुसतीच वाचायची नाही तर ती 'भोगायची' असते. त्यासाठी पूर्वग्रहांची सर्व वस्त्रं बाजूला सारून निर्वस्त्र होऊन तिला सामोरं जायला हवं. पूर्वग्रहदूषित असून चालणार नाही. नितळ मनानं कवितेच्या तळयात उतरलं तर सौंदर्याची कमळं हाती लागण्याचा संभव असतो, अन्यथा नाही."

अशी एकाहून एक शब्दांची, अनुभितींची सौंदर्यस्थळं वाचक रसिकांना या ललित लेखसंग्रहात जागोजागी अनुभवायला मिळतात. याचे प्रमुख कारण म्हणजे लेखक हा प्रथम संवेदनशील मन लाभलेला कवी आहे. ' चाफा बोलेना..चाफा चालेना ' असं भावविभोर, काळजातून लिहिणाऱ्या कवी बी म्हणजेच नारायण मुरलीधर गुप्ते (१ जून १८७२ ते ३० ऑगस्ट १९४७) यांचे हे लेखक, कवी नातू आहेत. असा समृद्ध वारसा, कवितेचा प्रसन्न झरा ज्यांच्या रंध्रारंध्रातून वहात आहेत असे कवी, लेखक, मित्रवर्य अशोक दत्तात्रय गुप्ते यांचे 'चिंतन झुंबराची प्रकाशवलये' हे आत्मचिंतनात्मक ललितलेख संग्रहाचे पुस्तक प्रकाशित झाले आहे. एकूण एकतीस लेखांमधून गुप्ते सरांनी वाचक रसिकांशी लालित्यपूर्ण संवाद साधला आहे. अध्यात्मिक बैठक, शब्दांची उत्तम जाण, सहज-सुंदर प्रसन्न शब्दकळा, उत्तम वाचक असल्याने लेखात डोकावणारे अनेक रसपूर्ण संदर्भ, अशा वैशिष्ट्यांमुळे गुप्ते सरांचा हा लेख संग्रह वाचकाला एका समृद्ध विश्वाचे दर्शन देतो.

'ललित' याचा अर्थ म्हणजे सुंदर, सौंदर्य. या ललित वाङ्मय प्रकारात कलात्मक किंवा सौंदर्यपूर्ण लेखनाचा समावेश

होतो. आजूबाजूला घडणाऱ्या विविध घटना, किस्से, प्रसंग, निसर्ग, विविध प्रवृत्तीची माणसे, आठवणी याचा आधार मुखत्वे ललित लेखनाला असला तरी त्यातुन साकारणाऱ्या अदभूत विश्वाची सफर, वेगळी ओळख लेखक आपल्या कल्पनाशक्तीतून, लाभलेल्या प्रतिभेतून आणि अनुभव विश्वातून कागदावर साकारत असतो. लेखक, कवी अशोक गुप्ते यांनी अशाच अनुभवविश्वाची रसपूर्ण सफर या पुस्तकाद्वारे वाचकांना घडवली आहे. कवी अशोक गुप्ते यांचे हे सहावे पुस्तक.

लेखकाने आपल्या मनोगतातून ललित लेखाची परंपरा, आलेले अनुभव, विविध टप्पांमध्ये गवसलेली व्यक्तिमत्वं, आणि लेखन प्रवास रेखाटला आहे. त्यात ते म्हणतात " या साऱ्या चिंतनाच्या परिपाकातून, निर्मितीप्रक्रियेच्या गुऱ्हाळातून साकार झालेले माझे हे काही ललित लेख. म्हणूनच या संग्रहाचे नाव 'चिंतनझुंबराची प्रकाशवलये असे ठेवले. तर सुप्रसिद्ध कवी, गीतकार श्री अशोक बागवे यांनी या सुंदर प्रस्तावना दिली आहे. ते संवाद साधतात " यात झुंबरे आहेत, पण ती डोळे दिपवणारी नाहीत, तर आल्हाददायक मन : प्रभेची निरांजने ठरली आहेत.! " कित्ती सुरेख.

अध्यात्मिक स्वरूपाचे लेखन, बोधप्रद, संदेशात्मक लेखन, संस्कृती-परंपरेवरचे भाष्य, कवितेसंबंधी, व्यक्तिचित्रण, अशा विविध विषयांची बिलोरी प्रकाशवलये लेखकाने या पुस्तकात रेखाटली आहेत. जागेअभावी सर्वच एकतीस लेखांचा परामर्श इथे घेणे केवळ अशक्य. परंतु काही भावलेल्या लेखांची झलक खास वाचकांसाठी. 'नमन' या पहिल्याच लेखातून ज्ञानेश्वर माउलींच्या ओव्यांचा संदर्भ देऊन वर्तमानकाळातील बदलत्या चालीरीतींबद्दल, बदललेल्या भाषेबद्दल, समाजाबद्दल, व एकूणच जगण्याबद्दलची निरीक्षणे नोंदवली आहेत. पहिल्या पावसाच्या परिमळ कोणाला आवडत नाही? तर विविध वासांचे अंतरंग, बाह्यरंग छान उलगडून दाखवले आहे ' वासांच्या सहवासात' या लेखातून. ' इके बुगा..इके बुगा' या नावातच बालकाचे निर्व्याज हास्य लपले आहे. जरूर वाचावा असा लेख. कवितेचं सुचणं, प्रसवणं आणि नंतर कागदावर उमटणं हे खरोखरच हॅपनिंग असतं. कवितेच्या एकूण निर्मितीप्रक्रियेबद्दलची आपली मतं, निरीक्षणे विविध कवितांचे संदर्भ देऊन अभ्यासपूर्ण लिहिले आहे ते 'शब्दांच्या अर्भकांची गर्भस्थाने' या लेखातून. त्याच प्रमाणे 'कविता: एक भोगणे' आणि 'कविता : एक वाचणे' हेही

दोन लेख वाचावेत असे. अध्यात्म म्हणजे नेमकं काय? पूजाअर्चा, कर्मकांड की आणखीन काही? या सर्वांची उत्तरं तुम्हाला 'माझे अध्यात्म' मध्ये सापडतील. समर्थांनी चारशे वर्षांपूर्वी आपल्या मनाच्या श्लोकांमधून जीवनाचे सार, आयुष्याचे गणित आणि प्रपंचाचे गुपित समर्थ शब्दात सांगितले आहे. आज २०२१ काळात देखील ते संदर्भ, त्यातले तत्वज्ञान तंतोतंत लागू पडतात. 'तुटे वाद-संवाद तो हितकारी' या लेखातून समर्थांच्या अमृतशब्दांचा आधार घेत आजच्या वर्तमान काळातील अनेक विषयांवर लेखकाने मौलिक भाष्य केलं आहे. विविध चॅनल्सवर सध्या निरागस मुलांचे रियालिटी शो सतत सुरु असतात. त्यातील वेदना, जीवघेणी स्पर्धा, मनाचे कोमेजून जाणे यावर भाष्य केले आहे ते त्या 'छोट्याचे भावविश्व आणि रियॅलिटी शो या लेखातून. आपले आजोबा कविश्रेष्ठ कवी बी यांच्याबद्दलचा 'न कोमेजलेला 'चाफा' हाही लेख जरूर वाचावा असा. डोंबिवलीतलं एक व्रतस्थ, निर्मोही व्यक्तिमत्व म्हणजे कविश्रेष्ठ द भा धामणस्कर. यांच्या एकूण कविता प्रवासाबद्दल काय बोलावे आणि कसे. त्यांना मीही प्रत्यक्ष भेटल्यावर माझीही अवस्था गुप्ते सरांसारखीच झाली होती. त्यांचा आशीर्वाद लाभणे म्हणजे परमोच्च समाधानाचा

कृतार्थ बिंदू. 'समाधान संक्रमित करणारा कलावंत' या लेखातून दभांचे अंतरंग कवितेच्या अंगाने उलगडून दाखवले आहे. आणि संग्रहातील शेवटचा लेख. गुप्ते सर ज्यांना कवितेतले गुरु मानतात ते सर्वांचे आवडते कवी, गीतकार अशोक बागवे सर. लेखनाच्या वेगवेगळया टप्पात लेखकाला लाभलेलं बागवे सरांचे मौलिक मार्गदर्शन, सूचना, दिलासा. बागवे सरांचं मोठेपण, शब्दांवरची हुकूमत सारं सारं शब्दबद्ध झालं आहे 'अशोक बागवे स्कुल ऑफ पोएट्री' या सहज-सुंदर लेखातून.

या सुंदर पुस्तकाचे अंतरंग आणि बाह्यरंग सजवले आहे ते पुण्याच्या 'संवेदना प्रकाशन' यांनी. मुखपृष्ठ, मांडणी आणि बांधणी अप्रतिम. कवी मनाच्या गाभाऱ्यात मंदपणे हलणारी ही चिंतन झुंबरे वाचक रसिकांना नक्कीच सुखावतील यात शंकाच नाही.

**(चिंतन झुंबरांची प्रकाश वलये, (ललितलेख संग्रह), अशोक गुप्ते, संवेदना प्रकाशन, पुणे)**

# ३५. समुद्रायनः
# पत्रसंवादातून उमटलेली हळुवार गाज




**हजार जिव्हा तुझ्या गर्जु दे प्रतिध्वनीने त्या समुद्रा, डळमळु दे तारे!**

**विराट वादळ हेलकावु दे पर्वत पाण्याचे**
**ढळू दे दिशाकोन सारे!**
**सहकाऱ्यांनो, का ही खंती जन्म खलाशांचा**
**झुंजण्या अखंड संग्राम**
**नक्षत्रापरि असीम नीलामधे संचरावे**
**दिशांचे आम्हाला घाम!**
**चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती**
**कथा या खुळ्या सागराला**
**"अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन आशा**
**किनारा तुला पामराला! "**

ज्ञानपीठकार, कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या गाजलेल्या 'कोलंबसाचे गर्व-गीत' या कवितेतल्या ओळी. कविता वाचल्यावर प्रथमदर्शनी वाटते की हे गर्व गीत आहे किंवा समुद्राच्या पार्श्वभूमीवर रेखाटलेले एक सुंदर शब्दचित्र आहे. पण वाचक मित्रांनो ही कविता आहे, गीत आहे माणसाच्या दुर्दम्य इच्छाशक्तीचे, महत्वाकांक्षेचे आणि ध्येयासक्तीचे. समुद्र.

पहिल्या भेटीत दिसतो तो निवांत, शांत आणि काहीसा गहिरा समुद्र . मग हळूहळू जसजसे त्याच्या पोटात आपण शिरू लागतो तस तसा त्याच्या स्वभावाचा थांग लागतो. एकेक गोष्टी कळू लागतात, त्याचे पैलू समजू लागतात. वरकरणी शांत परंतु प्रचंड आतून अस्वस्थ. त्याच्या मनाचा थांग लागणार नाही कधीच.. अगदी माणसाला देखील. या समुद्रावर पसरलेल्या अमर्याद आकाशाची निळाई डोळ्यांना सुखावते मात्र दुसऱ्याच क्षणी निळाई काळ्याकुट्ट ढगात बेमालूमपणे लुप्त होते आणि समुद्रात उठू लागतात अक्राळविक्राळ लाटांचे अजस्त्र बाहू. या समुद्रावर स्वार होताना एक वेळ अशीही येते, "समुद्री चहूकडे पाणी, पिण्याला थेंबही नाही" आणि त्यानंतर यथावकाश येते गहिरी आठवण, भूमीची, मातीची, आपल्या माणसांची.

वय वर्षे फक्त अठरा. बारावीला मनासारखे गुण न मिळालेल्या वैभवाने बीएस्सीला नाईलाजाने प्रवेश घेतला. वैभवच्या मनात कुठंतरी अस्वस्थता जाणवत होती, स्वतःला वेगळ्या प्रकारे सिद्ध करण्यास तो आतूर होता. योगायोग म्हणा, अगदी त्याचवेळी कुठल्याशा वृत्तपत्रात 'वरुण शिपिंग'

कंपनीची जाहिरात येते. प्रशिक्षणार्थी हवेत. कुणालाही न सांगता वैभव कंपनीकडे अर्ज पाठवतो. प्रथम लेखी आणि नंतरच्या मुलाखतीत तो उत्तम गुणांनी उत्तीर्ण होतो.कंपनीकडून 'डेक कॅडेट' नेमणुकीचे रीतसर पत्र आल्यावर घरामध्ये साऱ्यांना सारे काही समजते. सर्वांना कळून चुकते वैभव आता काही महिन्यांसाठी नव्हे काही वर्षांसाठी खूप दूर जिथे फक्त आणि फक्त समुद्रच असेल तिथे कामासाठी जाणार. त्याचे कसे होणार? त्याला कोण बघणार? खरं तर आईवडिलांना, सगेसोयऱ्यांना, जिवलगांना वैभवचा अभिमान वाटत होता तर दुसरीकडे काळजात कुठेतरी रुखरुख दाटून राहिली होती. ७ सप्टेंबर १९८८ रोजी वैभव मद्रास बंदरातील शिपिंग कंपनीच्या वायुदूत (तेल व रसायन वाहून नेणाऱ्या जहाजावर) जहाजावर रुजू होतो.

एक नाही..दोन नाही..तर तब्बल अठरा महिन्यांच्या जगप्रवासास निघालेला हा छोटा वैभव कधी प्रतिकूल तर कधी अनुकूल अशा बेभान, उत्कट, आणि विलक्षण अशा अनुभूतींच्या लाटांवर बेडरपणे स्वार झाला, सिद्ध झाला. त्याकाळी ईमेल, इंटरनेट अशी कोणतीही माध्यमं उपलब्ध

नव्हती. एकमेकांची खुशाली केवळ आणि केवळ पात्रांद्वारेच समजायची, उमजायची तो काळ. दिवसभर जहाजावर विविध कामांमध्ये गुंतल्यावर डेकवर निवांत वेळ मिळायचा एखाद्या कातर संध्याकाळी. तेव्हा आभाळ कधी स्वच्छ असायचं तर कधी भरून यायचं. वैभवच्या मनाची नेमकी तीच अवस्था व्हायची. आईबाबांची, लहानग्या भावाची आठवण येणं अगदी अपरिहार्य. वैभवाचे डोळे त्यावेळी दूरवर क्षितिजापाशी खिळून राहायचे, लक्ष आठवांच्या ओढीने भरून यायचे अगदी आभाळासारखे. आणि मग..मग..तत्क्षणी जे काही काळजातून उत्स्फूर्तपणे बाहेर यायचे ते सारे पत्रांवर उमटायचे. होय. ही पत्रच दुवा बनून राहिली, वैभवाचे आयुष्य समृद्ध करून गेली. वैभवाने आईबाबांना, भावाला तर कधी मित्रांना लिहिलेली पत्रं. एकेक पत्र म्हणजे चिंब भिजलेल्या आठवणी. कधी हसऱ्या तर कधी हळव्या. या सर्व तीसेक पत्रांचा एक मोठा गुच्छ म्हणजेच हे समुद्रायन पुस्तक. एक नितांतसुंदर पुस्तक. समुद्रायन हे आत्मकथन नाही, प्रवासवर्णनही नाही तर हे एक ओथंबलेल्या भावनांची, आठवांची, आतुरतेने वाट पाहणाऱ्या डोळयांची काव्यमय स्वगतं आहेत.

वाचकमित्रांनो. याच अथांग समुद्रावर राज्य करणाऱ्या अशा एका दर्यादिल, संवेदनशील कवी मनाच्या कॅप्टनचे मनोगत वाचा.

"आज मी सागराचे एक अप्रतिम रूप पाहिले. समुद्र इतका शांत आहे की, वाटावे जहाज निळ्या काचेवरून चालले आहे. सागर आरशासारखा चमकतो आहे. एकही लाट नाही, वर आकाशही तसेच स्वच्छ, रुपयाच्या नाण्याएवढ्या दिसणाऱ्या ताऱ्यांनी गच्च भरलेलं. त्यामधून डोकावणारी नाजूक चंद्रकोर.चंद्रकोर पाहिल्याबरोबर छत्रपतींच्या भाळी शोभणाऱ्या चंद्रकोरीसारख्या गंधाची आठवण झाली. जसजसे जहाज ते शांत पाणी कापत जात आहे, तसतसे जहाजाच्या बाजूने निळ्या रेषा प्रकाशमान होत आहेत. हे सारं सौंदर्य वेगळंच होतं."

कॅप्टन वैभव दळवी यांच्या सहजसुंदर शब्दशैलीतून पत्रांच्या माध्यमातून अवतरलेलं 'समुद्रायन' हे पुस्तक २०१५ मध्ये प्रकाशित झालं. यापूर्वी माझ्या आठवणीत कधीकाळी

दर्यावर्दी सिंदबाद, कोलंबसाचे चार प्रवास, माझा समुद्रशोध, कॅप्टन दिलीप दोंदे यांनी विश्व सागरपरिक्रमेवर लिहिलेले अनुभवकथन वाचले होते. मात्र सर्वांपेक्षा समुद्रायन हे पुस्तक मला वेगळे भासले, भावले. त्या अठरा महिन्यांच्या काळात (१९८८ ते १९९०) या सागरी प्रवासाच्या निमित्ताने झालेले अवघ्या विश्वाचे अदभूत दर्शन, त्या त्या देशांची, परंपरा, खाद्य-संस्कृती, निसर्ग, माणसं, भाषा वैभवाला अगदी जवळून आत्मसात करता आली. या जगप्रदक्षिणेत पनामा कालवा तीन वेळा, सुवेझ कालवा दोन वेळा पार केला तर आठ वेळा विषुववृत्त पार केले... या प्रवासात कॅप्टन वैभव यांनी त्यांचे दोन वाढदिवस, तर दिवाळी दोन वेळा वायुदूतावर साजरी केली. इंडोनेशिया, सिंगापूर, दक्षिण कोरिया, जपान, सीरिया, इटली, चीन, ऑस्ट्रेलिया, ह्यूस्टन, पोर्तुगाल, कॅनडा, प. जर्मनी, आयलंड, अशा अनेक देशांचे दर्शन या पत्रसंवादातून वाचकाला घडते. पत्रातली शब्दशैली काव्यमय आहे कारण कॅप्टन वैभव हे एक उत्तम गझलकार, कवी आहेत. आपल्या वडिलांकडून त्यांना हा वारसा मिळाला असावा, कारण त्यांचे वडील हे उत्तम गझलकार, त्यांचा 'सल' कविता संग्रह देखील प्रकाशित झालेला. कॅप्टन वैभव यांच्या आई या

मुख्याध्यापिका म्हणून सेवानिवृत्त. अशा वाङ्मयीन वातावरण लाभलेल्या वैभवावर, त्यांच्या शब्दशैलीवर उत्तम संस्कार झालेले दिसून येतातच.

डेक कॅडेट ते कॅप्टन असा वैभवाचा झालेला प्रवास थक्क करणारा आहे. कॅप्टन दळवी हे सध्या व्ही शिप्स या आंतरराष्ट्रीय कंपनीत जनरल मॅनेजर या वरिष्ठ पदावर कार्यरत आहेत. आपल्या अंगभूत कर्तृत्वाच्या जोरावर कॅप्टन दळवींनी अनेक महत्वाच्या पदांवर काम केले आहे. 'समुद्रायन' या पुस्तकाला अनेक पुरस्कार लाभले. 'समुद्रायन' च्या इंग्रजी आवृत्तीला NUSI या सर्वात जुन्या जागतिक Seafares संस्थेने सन्मानित केले. तर कोमसाप चा २०१८-१९ या वर्षाचा राज्यस्तरीय पुरस्कार या पुस्तकाला प्रदान करण्यात आला. मध्यंतरी सादर झालेला 'समुद्रायन' चा रंगमंचीय अविष्कार तितकाच मला भावला होता.

कॅप्टन वैभव दळवी यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख दिवसेंदिवस उंचावत आहे, बहरत आहे. आपल्या आईवडिलांचा, गुरुजनांचा लाभलेला आशीर्वाद, मार्गदर्शन हीच तर त्यांची मोठी पुंजी आहे. कधीही न संपणारी. कॅप्टन

दळवी यांचे वडील म्हणजे आप्पा दळवी यांच्या काव्यमय ओळी नकळतपणे स्मरू लागतात, 'समुद्रायन' ला भरभरून आशीर्वाद देतात.

**नभी तळपतो अढळ ध्रूव तो, लाख सभोती जरी चांदण्या**
**अचल राहू दे श्रद्धा तैसी, भवसागर हा तरून जाण्या!**
**पंख पसरुनि आशिर्वादा, अवनीवरती अवघे अंबर**
**तसे असू दे तुझियावरती, परमेशाचे छत्र निरंतर!**
**(समुद्रायन (पत्ररूप आठवणी), कॅप्टन वैभव दळवी, प्रकाशिका सौ कीर्ती वैभव दळवी, ठाणे.)**

# ३६. ** भावव्याकुळ तिन्हीसांज **




कुणास कळे मग मनाचे चित्रच पालटते
उन्हाची झिरमिर नक्षी, अंगभर उमटते

अंगांगावर विळखलेले, मळभ धुऊन जाते
प्रकाशाच्या स्वच्छ किरणात, मन न्हाऊन घेते

**घुसमटलेला श्वास होतो, मुक्त स्वच्छंद**
**मरगळ सरते, संचारतो शुद्ध आनंद**

**आयुष्याच्या सुख-दुःखाच्या, अशाच असतात तऱ्हा**
**ऐन बहरात कहर करतो, कधी वादळवारा**

**सावल्यांचा थंड शापात, उन्हे उब देतात**
**उन्हाच्या प्रखर तापात, सावल्या उः शाप होतात.!**

आयुष्याच्या उन-सावल्यांच्या भावविभोर खेळात अगदी अवचितपणे जेव्हा एखाद्या संवेदनशील मनाला गवसतो जीवनाचा अर्थ आणि त्या सहज-सुंदर शब्दफुलांची बनते एक कविता. त्या अनुभूतीची कविता कशी आणि केव्हा होईल हे काही सांगता येणार नाही. यावरून मला प्रख्यात कवयित्री, गीतकार शांताबाई शेळके यांनी या निर्मिती क्षणाची एक सुंदर गोष्ट सांगितली ती आठवते. त्या म्हणतात " कविता म्हणजे नेमकं काय? तिचं स्वरूप, वैशिष्ट्यं, रूप, वेगळंपण, ती कधी अवतरते? हे आजपर्यंत कुठल्याही कवीला, समीक्षकाला, विचारवंतांना निश्चितपणे सांगता आलेलं नाही. हे थोडंसं

ईश्वराच्या वर्णनासारखं आहे. म्हणजे बघा. 'परमेश्वर कसा दिसतो, कुठे राहतो, कधी अवतरतो हे आजपर्यंत कुठल्याही साधुपुरुषांना, तत्वचिंतकांना, पंडितांना स्पष्टपणे सांगता आलेलं नाहीये. " मनापासून पटलं ना? किती सुंदर. हे कवितेचं अबोध नातं ठाण्याच्या ज्येष्ठ कवयित्री, लेखिका सुमनताई श्रीराम फडके यांनी काळजात जपलं आहे.

तेवीस कवितांनी सजलेली ही भावव्याकुळ 'तिन्हीसांज'. एकाचवेळी मनाला मोहित करणारी, तर कधी हुरहूर लावणारी. आजपर्यंत सुमनताईंची एकूण तेवीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. कथा, कादंबरी,ललित लेख संग्रह आणि कविता अशा प्रांतात त्यांनी विपुल लेखन केले आहे. त्यापैकी तेरा पुस्तके ही कवितांनी नटलेली. विविध वृत्तपत्रात, मासिकात त्यांचे दर्जेदार लेखन आजवर प्रकाशित झाले आहे. अनेक साहित्यकृतींना विविध संस्थांचे पुरस्कार लाभले आहेत. मुंबई आकाशवाणी येथून त्यांच्या साहित्यकृतींचे सादरीकरण. त्याचबरोबर शास्त्रीय संगीताची आवड जोपासत आयुष्याला सामोऱ्या जाणाऱ्या सुमनताईंचा साहित्य प्रवास समृद्ध आहे. आज वयाच्या ८८ व्या वर्षीदेखील तितक्याच उमेदीने सुमनताई

लेखनात मग्न आहेत, काही क्रिएटिव्ह करू पहात आहेत हे विशेष. आयुष्याच्या तिन्हीसांजेस त्या अगदी तृप्त, समाधानी आणि निश्चिन्त आहेत. याचे एकमेव कारण की त्या 'कविता' जगत आहेत. आयुष्याबद्दलची कुठलीही खंत नाही की तक्रार नाही. त्यांच्या कविता वाचताना जीवनाकडे बघण्याचा त्यांचा सकारात्मक दृष्टिकोन अनुभवायला येतो. सुमनताईंच्या लेखनात वाचकरसिकाला निसर्गाचे विविध आविष्कार, कधी नात्यांची घट्ट वीण तर कधी पडझड, मानवी स्वभावाची चित्रं, सामाजिक भान ही वैशिष्ट्य दिसून येतात.

'काळ-काम-वेग'. संग्रहातील पहिलीच कविता. तिचे रूप अभंगासारखे. . काम आणि वेग हे महानगरीय जगण्याचे जणू सूत्र. 'जीवनभराची अशी ही शर्यत..... जो तो करी शर्थ... टिकण्याची! अगदी खरे. तर 'वेध' या कवितेमधून वृक्षाचे मनोगत, व्यथा समर्थपणे रेखाटली आहे. 'विझू विझू चैतन्याचा, अनुभवित भ्रमनिरास....झाड लगेच सावरते, केविलवाणे मोजीत श्वास'... या ओळी अस्वस्थ करतात.

**'विमनस्क अवस्था माझी, वाटे, वाट कुणास पुसावी?**

**माणसांना माणसांची का, इतुकी घृणा असावी!**

माणसांच्या चित्रविचित्र स्वभावाचे दर्शन 'पुरेवाट' या कवितेत आपणाला होते. तर दुसरीकडे 'भरत वाक्य' या वेगळ्या कवितेतून अटळ मरणाविषयीचे प्रखर भाष्य केले आहे. कवयित्री म्हणते " आयुष्य जगण्याची, सर्वांची एकच वाट आहे..... दूर एका वळणावर, अटळ स्मशान घाट आहे!"

'बोध' ही कविता वाचताना अगदी सहज कवी अनंत फंदी यांच्या 'बिकटवाट वहिवाट नसावी' या फटक्याची आठवण झाली. जीवनाचे तत्वज्ञान आणि संदेश कवितेतून मांडलेला आहे. कवितेतल्या या दोन ओळी आयुष्याचा किती सुंदर अर्थ सांगून जातात पहा.

**'घड्याळ पालथे घालून, काळ थांबत नाही**

**मोजलेले श्वास संपले की, जगणे लांबत नाही.**

सुमनताईंना शास्त्रीय संगीताची आवड आहे आणि त्याचे प्रतिबिंब जणू त्यांच्या 'मारवा' या कवितेत पडलेलं दिसतं. मारवा या हुरहूर लावणाऱ्या रागाचे सौंदर्य, महती आणि लक्षणे कवितेच्या ओळीतून अनुभवायला मिळतात. ' माझी

माय' कवितेतून आजच्या इंग्राजळेल्या काळातील मराठी ज्ञानभाषेचे महत्व सुरेखपणे उलगडून दाखवले आहे. 'टिंब' या मुक्तछंद कवितेत 'एक खूण मागे उरते - आणि सारे 'मी' पण सरते' ही ओळ मनावर ठसते. 'उबदार; कवितेतून नात्यांचा प्रसन्न गोडवा, स्नेहाची अबोल भाषा धाग्याच्या माध्यमातून रेखाटली आहे. प्रख्यात इंग्लिश रोमँटिक कवी विल्यम वर्डस्वर्थ यांच्या डॅफोडिल्स कवितेचा स्वैर अनुवाद छान जमला आहे. 'सरले मळभ' कवितेत 'कोरोनाचे दाटून आलेलं मळभ लवकरच दूर होईल असा सकारात्मक विचार मांडला आहे.

आजूबाजूच्या कोलाहलात वावरताना कवयित्री सुमनताईंनी मात्र आपला अंतर्मनातला सच्चा आश्वासक सूर कवितेमधून जपला आहे. या सुरांची, शब्दांची स्पंदने त्यांच्या पुढील साहित्यकृतीत आपणाला नक्की अनुभवायला मिळतील.

**(तिन्हीसांज (कविता संग्रह), सुमन फडके, संवेदना प्रकाशन, ठाणे.)**

# ३७. या विश्वाची एकतानता हे माझे गाणे




"१९५८ साली मी दिल्लीला गेले होते, तेव्हा सगळ्यांनी मला सांगितलं की मी पं. नेहरूजींना आवर्जून भेटलं पाहिजे. कलाकारांना भेटून ते खूप खुश होतात. मी त्यांना

भेटले. पंडितजी म्हणाले "तुम्ही कशाला आलात?" मी सांगितलं " ‘‘मी आपल्याला आमंत्रण करायला आलेय. आज संध्याकाळी माझा कार्यक्रम आहे, आणि माझी इच्छा आहे की त्या कार्यक्रमाला आपण आवर्जून यावं." नेहरू म्हणाले " गाणं ऐकायला माझ्याकडे वेळ कुठे आहे? काश्मीर प्रकरणामुळे मी खूप दुःखी आहे." त्यानंतर एकदा ते मुंबईला आले होते, तेव्हा महाराष्ट्राच्या एका मंत्र्यांनी येऊन दीदींना सांगितलं की पंडितजींपुढे त्यांनी जरूर गावं. पण दीदींनी त्याला साफ नकार दिला. पण चीनने भारतावर आक्रमण केलं. त्यानंतर दिल्लीतील त्या प्रसिद्ध कार्यक्रमात दीदींनी त्यांचं ते सुविख्यात गीत पहिल्यांदा गायलं. 'ऐ मेरे वतन के लोगो, जरा आंख मे भरलो पानी' नेहरूजी कार्यक्रमाला उपस्थित होते. कवी प्रदीप यांचं हे गीत ऐकून नेहरूजींच्या डोळयात पाणी उभं राहिलं. त्यांच्या रडण्यामुळे हे गीत प्रसिद्ध झालं.!

" 'बळवंत संगीत मंडळी' ही कंपनी बंद झाल्यावर आम्ही काही काळ आजोळी राहिलो. मग पुण्यात येऊन स्थायिक झालो. मी आणि बाबांनी चरितार्थासाठी शास्त्रीय गायनाचे कार्यक्रम सुरु केले. माझं वय तेव्हा १०-११ वर्षांचं

होतं. आम्ही खूप कार्यक्रम केले. मी त्यात ख्याल गायनाबरोबरच नाट्यगीतं, भजनं वगैरे म्हणायची. पण १९४२ साली बाबांचं निधन झालं आणि माझ्यावर खूप मोठी जबाबदारी येऊन पडली. सगळ्यात आधी मी मंचावरून गायले ते सोलापूरमध्ये. त्यानंतर आम्ही गोव्याला गेलो. बाबांनी माईला आधीच सांगितलं होतं की अमुक अमुक दिवशी ते या जगात राहणार नाहीत आणि खरोखरच त्याच दिवशी बाबांनी देहत्याग केला. त्यानंतरच्या कालखंडात मी आपलं म्हणावं असा कोणी नातेवाईक माझ्या लक्षात येत नाही. बाबा होते तोपर्यंत असंख्य नातेवाईक आमच्या घरी महिनोंन महिने येऊन राहत होते. पण बाबा गेल्यावर आमच्या मदतीसाठी कुणीच पुढे आले नाही. त्यानंतर सारी जबाबदारी माझ्यावर येऊन पडली,. मी मोठी आहे याची मला जाणीव झाली."

"मजबूर चित्रपटासाठीं मी आणि मुकेशनी 'अंग्रेजी छोरा चला गया' हे गाणं म्हंटलं होतं. १९४७ साली आलेलं हे गाणं म्हणजे पार्श्वगायिका म्हणून आलेलं माझं पहिलं गाणं! " " २००१ मध्ये मला भारतरत्न मिळालं. मी तेव्हा लंडनला गेले होते. भारतरत्न हा आपल्या देशाचा सर्वोच्च सन्मान आहे. ती

बातमी ऐकल्यावर मला वाटलं मी माझ्या घरी, माझ्या देशात असते, तर मला सगळ्यांचे फुललेले चेहरे तरी बघायला मिळाले असते. त्याच सुमारास गुजरातला भीषण भूकंप झाला. भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी एक कार्यक्रम मी आयोजित केला. त्यासाठी मी भारतात परतले."

" मी 'काळे पाणी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अंदमानला गेले होते तेव्हा स्वा. सावरकरांच्या वास्तव्याने पुनित झालेल्या काळकोठडीसमोर उभी राहून विचार करत होते की ते येथे कसे राहिले असतील. ते क्रांतिकारक होतेच पण ते लेखक व कवी होते हे मला माहित नव्हते. सावरकरांच्या कविता मी गायल्या आहेत. त्याच सुमारास ते काळ्या पाण्याची शिक्षा भोगून घरी परतले होते. तेव्हा रोज संध्याकाळी मी, माई, हृदयनाथ, उषा, मीना असे आम्ही त्यांच्या घरी त्यांना भेटायला जात असू. एक काळ असा होता की सावरकरांनी लिहिलेली गाणी गायला रेडिओवर बंदी होती. मी त्याची गीतं गायली मात्र ती रेडिओवर वाजत नसत.! "

लता मंगेशकर. या पाच अक्षरांमध्ये सामावला आहे अमृतमय स्वरांचा स्वर्गीय, जादू भरी आवाज. या आवाजाला

कोणतेही बंधन नाही की कोणत्याही सीमारेषाही नाहीत. हा नादमय, वेडावणारा स्वर देश, धर्म, आणि भाषेच्या पलीकडे जाऊन स्थिरावणारा आहे, मनाला अनोखी शांती देणारा आहे. हा आवाज केवळ भारतापुरता मर्यादित नाही तर तो अवघ्या विश्वाला साद घालणारा आहे, आपलेसे करणारा आहे. समजा, एखाद्या परग्रहावरून आलेले यान जर पृथ्वीपाशी आले तर आपल्या भारताच्या नकाशावर काही क्षण रेंगाळेल, क्षणभर थांबेल आणि दीदींचे चैतन्यमय गाणे ऐकून हलकेच निघूनही जाईल. लतादीदींच्या आवाजातच ही जादू आहे. तब्बल सात दशके मनाला विलक्षण समाधान देणारा दीदींचा स्वर्गीय, सात्विक आवाज आपण अगदी रोज रात्रंदिवस ऐकत आहोत, आणि तो आवाज ऐकल्यावर आपल्या साऱ्या चिंता, निराशा, दुःखे क्षणभर का होईना हलकी होत आहेत याबद्दल आपण साऱ्यांनीच त्या परमेश्वराचे आभार मानायला हवेत. लतादीदींनी खऱ्या अर्थाने आपल्या गाण्याला सुरवात केली ती १९४२ मध्ये. तिथपासून थेट २०१९ पर्यंत लतादीदींच्या एकूण गानकर्तृत्वावर नुसती धावती नजर टाकली तरी आपली पुरती दमछाक होईल.

लता मंगेशकर या नावाचा समृद्ध, विशाल कॅनव्हास अनेक संतांच्या, कवींच्या, गीतकारांच्या अभिजात शब्दांचे रंग घेऊन आणि प्रतिभाशाली संगीतकारांच्या स्वरांचे साज लेवून रसिकांच्या समोर जणू प्रगटला आहे आणि लाखो रसिक तल्लीन होऊन त्या हजारो गीतांच्या स्वरधारांमध्ये चिंब भिजत आहेत . त्या कॅनव्हासचे रूप किती सुंदर आणि आगळे दिसत असेल नाही? लतादीदींच्या एकूण संगीतकारकीर्दीवर, जीवनप्रवासावर अनेक लेखकांनी, समीक्षकांनी विविध भाषांमधून विपुल लिहिले आहे.मराठीत देखील अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. त्यातलेच एक गाजलेले अप्रतिम पुस्तक 'अक्षय गाणे'. या पुस्तकात लतादीदींचे आत्मकथनच आहे. पुस्तक वाचताना लतादीदी जणू वाचकरसिकांशी सुरेल संवाद साधत आहे असेच वाटते. या पुस्तकाच्या मूळ लेखिका आहेत न्यू दिल्ली इथे राहणाऱ्या श्रीमंती पद्मा सचदेव.मूळ पुस्तक हिंदीतून साकारले आहे आणि नंतर सुप्रसिद्ध लेखिका, अनुवादक जयश्री देसाई यांनी त्या पुस्तकाचा मराठीत सुंदर ओघवता अनुवाद केला आणि त्याचे झाले सुंदर संग्राही पुस्तक. 'अक्षय गाणे' हे मराठी पुस्तक मैत्रेय प्रकाशनने मे

२०१३ मध्ये प्रकाशित केले. त्यास वाचक रसिकांचा, संगीत प्रेमीमंडळींचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

कवयित्री, लेखिका, निवेदिका पद्मा सचदेव. जन्म पूरमंडल (जम्मु-काश्मीर) इथला. जम्मू इथल्या डोगरी भाषेचा लहेजा घेऊन त्यांनी अनेक कविता रचल्या. 'कतिपय' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह. पुढे त्यांच्या "मेरी कविता मेरे गीत" हा संग्रहास १९७० मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभला. हिंदी साहित्य सृष्टीमध्ये त्यांनी भरीव कामगिरी केली. अनेक महत्वाचे पुरस्कार त्यांना लाभले. १९६८ च्या सुमारास अगदी अकल्पीतपणे लता दीदींशी त्यांचा परिचय झाला, पुढे गाठीभेटी वाढल्या. पुढे तर लतादीदींच्या देशविदेशातील अनेक कार्यक्रमांचे निवेदन पद्माताईंनी सुरेखपणे केले. त्यांच्यातील मैत्रीचे अनोखी मैत्रीपर्व सुरु झाले. लतादीदी त्यांच्या तनमनात मनात इतक्या भिनून गेल्या की आपण लतादीदींच्या एकूण संगीतप्रवासावर, आठवणींवर आपण एखादे पुस्तक काढावे असे प्रकर्षाने त्यांना वाटून गेले. त्यानुसार पद्माताईंनी लतादीदींच्या एकूण जीवनप्रवासावर 'The Voice of a Nation' हे अप्रतिम पुस्तक लिहिले. ज्यामध्ये

लतादीदींच्या अनेक दुर्मिळ आठवणी, किस्से, घटना, गीतामागची कथा त्यांनी शब्दबद्ध केली आहे. हे हिंदीतलं गाजलेलं पुस्तक मराठीत यावं अशी लतादीदींची खूप इच्छा होती .काय सुंदर योग असतो पहा. एका कार्यक्रमाच्या निमित्ताने लतादीदींनी थेट जयश्री देसाईंना विनंती केली की आपण या पुस्तकाचा मराठीत अनुवाद करणार का? जयश्रीताईंना अर्थातच आनंद झाला. त्या कामाला लागल्या. आणि मराठीत एक अप्रतिम पुस्तक साकारले. "अक्षय गाणे" लतादीदींना हेही पुस्तक प्रचंड आवडले. दुर्देवाची गोष्ट. या पुस्तकाच्या मूळ लेखिका कवयित्री पद्माताई सचदेव यांचे दि ०४ ऑगस्ट २०२१ रोजी दुःखद निधन झाले.

आता खुद्द लतादीदी या पुस्तकाविषयी काय म्हणतात ते जाणून घेऊया. " माझ्यावर आत्तापर्यंत जी-जी पुस्तकं आली, विशेषतः मराठीत, त्यातलं हे मला सर्वात आवडलेलं, माझ्या सर्वात जवळ जाणारं पुस्तक आहे. मी, मला अत्यंत जवळ असणारी माझ्या घरची माणसं काय आहेत, मी कसं जीवन जगले, संघर्ष केला हे या पुस्तकाच्या माध्यमातून लोकांना समजलं याचा मला आनंद वाटतो. मी भावनिकदृष्ट्या माझ्या

घरच्यांच्या फार जवळ आहे. त्यामुळे माझ्या जीवनात जी काही अपूर्णता राहिली त्याचा मला काहीच खेद होत नाही. माझं हे भावविश्व या पुस्तकाने रसिकांसमोर खुलं केलं म्हणून हे पुस्तक मला खूप आवडतं."

२८ सप्टेंबर. स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांचा वाढदिवस. 'अक्षय गाणे' या पुस्तकाच्या निमित्ताने चला वाचूया लतादीदींच्या गायन कर्तृत्वाचा व स्मरणगाथेचा समृद्ध आलेख.

**(अक्षय गाणे (चरित्र), मूळ लेखिका- पद्मा सचदेव, अनुवाद - जयश्री देसाई, मैत्रेय प्रकाशन, ठाणे)**

## ३८.** अजून माझा करार बाकी आहे **




आयुष्याशी अजून माझा करार बाकी आहे
मावळताना लखलखण्याचा विचार बाकी आहे

आयुष्याची सकाळ माझ्या खरेच सुंदर गेली
संध्येची मज फिकीर नाही दुपार बाकी आहे

**आधाराने कसेबसे मज जगावयाचे नाही**
**जगण्यासाठी मनात ऊर्जा चिकार बाकी आहे**

**स्वार्थासाठी उगाच खोटा सलाम केला नाही**
**फाटत आलो तरी भरजरी किनार बाकी आहे**

**सर्व थरावर खरेच आता जगून माझे झाले**
**मात्र तेवढा स्मशानातला प्रकार बाकी आहे**

**सरणावरती आता खरोखर निघेन आनंदाने**
**पण मृत्यूचा अजून थोडा नकार बाकी आहे**

स्थळ गडकरी रंगायतन. संध्याकाळची कातर वेळ. रंगमंचावर अंधार दाटून आलाय. फक्त प्रकाशाचा एक झोत सांडलाय मधोमध बसलेल्या त्या कवीच्या व्यक्तिमत्वावर. त्या कवीच्या पहिल्या वहिल्या कवितासंग्रहाचे प्रकाशन. गडकरीं रंगायतन रसिकांनी तुडुंब भरलेलं आणि भारलेलं देखील! त्या कवीचे एकेक शब्द ऐकण्यास रसिक आतुर झालाय. कातर

आणि खर्जातल्या स्वरात तो कवी गजलचे एकेक तुकडे पेश करतोय आणि समोर दाटीवाटीने बसलेला रसिक 'क्या बात है...बहोत खूब " अशी उत्स्फूर्त दाद देतोय. तो स्थितप्रज्ञ कवी शांतपणे दुसऱ्या गजलेकडे वळतोय..पुन्हा टाळ्या ... पुन्हा वन्स मोअर. तो कवी आपल्या गजलांमधून आपल्या आयुष्याचे जणू चित्रच रेखाटतोय. अनेक उन्हाळे-पावसाळे अनुभवलेला, आयुष्याकडे त्रयस्थ नजरेने, गंभीरपणे पाहताना मनात खोलवर रुजलेले काही तो कवी गजलांमधून जोरकसपणे व्यक्त होतोय. " स्वार्थासाठी उगाच खोटा सलाम केला नाही, फाटत आलो तरी भरजरी किनार बाकी आहे " सारं काही भोगून सुद्धा कवी आपल्या सकारात्मक शब्दांमधून जीवनाचे सूत्र मांडतोय.

'दुःखालाही घट्ट उराशी धरता येते...आणिक त्याची सुंदर कविता करता येते' हे अनोखे तत्वज्ञान गजलांमध्ये पेश करणारे तुम्हा आम्हा साऱ्यांचे कवी आप्पा ठाकूर. एक निर्मोही, शांत, संयमी व्यक्तिमत्व. अप्पांची जशी शब्दांवर जबरदस्त हुकूमत आहे तशीच ती सादरीकारणावर देखील आहे.

अप्पांच्या गजला त्यांच्याच तोंडून ऐकणे म्हणजे आम्हा रसिकांच्या दृष्टीने एक सुंदर आनंद सोहळाच! कुठेही घाई नाही, गडबड नाही. गजल पेश करताना कुठलाही अविर्भाव नाही, नाटकीपणा तर नाहीच नाही. उभ्या आयुष्यात कधीकाळी निर्माण झालेले "गुंतलेले पाश" हा कवी हलकेच सोडवतोय, मुक्त होतोय. पण काही क्षणांपुरताच. पुन्हा ते पाश कवीच्या आसपास फिरत असतातच. कवी आप्पा ठाकूर यांचा "गुंतलेले पाश" हा पहिला मराठी गजल संग्रह एप्रिल २०१६ मध्ये सप्तसूर या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केला. त्या प्रकाशन समारंभाला मी उपस्थित होतो. प्रकाशनापूर्वी आप्पा ठाकूर यांनी काही निवडक गजल पेश केल्या. तिथे जमलेले रसिक निःशब्द झाले. प्रकाशन समारंभ संपन्न झाल्यावर रसिकांनी अप्पांना घातलेला घेराव डोळ्यासमोर अजूनही दिसतोय. ' आप्पा तुम्ही आम्हाला यापूर्वी कुठल्याच व्यासपीठावर कसे दिसला नाहीत हो? कुठे होतात? ' रसिक विचारत होते. त्यांना आप्पा अगदी शांतपणे उत्तरही देत होते.

गजलनवाज भीमराव पांचाळे हे आप्पा ठाकुरांचे आदर्श आणि मार्गदर्शक . अप्पांना गजल प्रांताची गोडी लागली ती भीमरावांच्या सहवासामुळेच. त्यांची सुंदर प्रस्तावना या संग्रहाला लाभली आहे. ते म्हणतात " माझ्या गजल कुटुंबातील एक म्हणजे आप्पा ठाकूर! नित्यनेमाने मैफिलीला सहकुटुंब हजेरी लावणारे आप्पा जिवलग मित्र व ग़ज़ल चळवळीतील हमसफर कधी झाले कळलेच नाही. अप्पांना काव्याचा छंद व ग़ज़ल लिहिण्याची उर्मी आहे हे कालांतराने कळले आणि आमची ग़ज़ल गुफ्तगू सुरु झाली. अप्पांनी ध्यास घेऊन ग़ज़लेची आराधना केली, सातत्य ठेवून गजल लेखन केले."

तसेच अप्पांचे मानसपुत्र, कवी, लेखक आणि ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त मा. संदीप माळवी साहेब काय म्हणतात पहा " अप्पांच्या गजलांचं जाणवलेलं वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या गजलांमधील तरलता, हळुवारता, भावनिकता, मनाला भिडणारी संवेदनशीलता, सच्चेपणा, वैचारिक समृद्धता, कसलीही गुंतागुंत नसणारी भावनिक स्पष्टता आणि साधेपणा यामुळेच अप्पांच्या गजला मनात खोलवर घर करून राहतात."

आणि ते बहुतांशी खरेही आहे. कुठेही शब्दांची ओढाताण नाही, विस्मयकारक वळणे नाहीत, बोजड शब्दही नाहीत किंवा अनपेक्षित धक्केही नाहीत. सहजसुंदर, संवादमय शब्दशैलीचा उत्सव अप्पांच्या गजलांत साकारलेला दिसतो. स्वतः गजलकार आप्पा आपल्याशी संवाद साधतात तेही अतिशय संक्षिप्त शब्दांमध्ये " जन्म मृत्यूच्या एकूण प्रवासाच्या वाटेवर माणसाला अनेक वळणे लागतात, ती पार करताना काही वळणावर इतके जबरदस्त हादरे बसतात आणि मग मनाच्या संवेदनांची घुसमट होते. अशाच एका वळणावर, थेट गजल ऐकण्याचे पर्याय दुरावल्यावर, हातात लेखणी आली आणि गजल लिहिता झालो." या गजलसंग्रहाचे बाह्यरूप देखील उत्कृष्ट, लोभस असे आहे. निर्मिती मूल्य उच्च प्रतीचे आहे. कारण संग्रहाचे मुखपृष्ठ आणि आतील सजावट साकारली आहे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सुलेखनकार अच्युत पालव यांनी. 'गुंतलेले पाश' या संग्रहाची आता दुसरी आवृत्ती लवकरच प्रकाशित होणार आहे. तसेच अप्पांचे दोन नवीन संग्रह (कविता आणि गजल) प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. 'गुंतलेले पाश' या रंगमंचीय अविष्काराचे देखील आत्तापर्यंत तेवीस प्रयोग झाले आहेत. संग्रहात एकूण ८८ गजला आहेत.

तरीही प्रत्येक गजलेचा विषय आगळावेगळा. त्यातील 'तूर्तास विठ्ठलाने' या गजलेत सद्यस्थितीवरचे नेमके भाष्य रेखाटले आहे.

**तूर्तास विठ्ठला तू आता असे करावे**
**सोडून वीट मागे, चालून दाखवावे**
**दारात दर्शनाला येतील मुख्यमंत्री**
**तेव्हा विठू तुझ्या तू मुकुटास सावरावे**
**होणार स्फोट नक्की देवा तुझ्या महाली**
**तक्रार घेऊनी तू दिल्लीकडे निघावे!**

यावर आपण काय बरे भाष्य करावे? आणि कसे बोलावे? अप्पांच्या अनेक गजला वाचताना आपल्याला असे कसे सुचले नाही हाही प्रश्न पडतोच.

**गुंतलेले पाश थोडे सैल करुनी घ्यायचे**
**वादळ आधीच तारू पैलतीरी न्यायचे**

**कैकदा येईल मृत्यू आपल्याला न्यायला**
**मात्र आपण आपल्या मर्जीप्रमाणे जायचे**

अतिशय अबोल स्वभाव असलेले आप्पा गजलेच्या माध्यमातून वाचकांशी असा संवाद साधतात. अल्पाक्षरी शब्दांच्या मांडणीतून जीवनावरचे अटळ सत्य, भाष्य अगदी सहजपणे व्यक्त करतात. पाठीशी शब्दांचे सामर्थ्य असेल, गजलेचा आशीर्वाद असेल तर खुद्द मृत्यूला देखील हुलकावणी देता येऊ शकेल आणि जेव्हा आपली मर्जी असेल तेव्हाच मी त्या मृत्यूला सामोरा जाईन. केवढे मोठं तत्वज्ञान या चार ओळींमध्ये अप्पांनी मांडलं आहे. जीवनात भोगलेले सुखदुःख, नातेसंबंध, प्रेम, वेदना, खंत सारं सारं अप्पांनी शब्दांच्या माध्यमातून प्रभावीपणे कागदावर उमटवलं. " मैफिलीतुनी मी जाताना, माझी छाया दाट असेल... प्रत्येकाच्या हृदयामध्ये, मला वेगळी वाट असेल" असे विधान करणारे आप्पा ठाकूर गजलप्रांतात सर्वार्थाने वेगळे भासतात, वेगळं काही सांगतात.

**(गुंतलेले पाश (कविता संग्रह), कवी आप्पा ठाकूर, सप्तसूर प्रकाशन.)**

## ३९. ** पुन्हा जन्मावा...खलील जिब्रान **




**प्रेम** : प्रेम जसे तुमच्या डोक्यावर मुकुट चढवून तुमचा सन्मान करते तसे ते तुम्हाला सूळावरही चढवील. जसे ते तुमच्या वृद्धीसाठी आहे, तसे ते तुमच्यातील नको असलेल्या

गोष्टींची काटछाट करणारेही आहे. प्रेम हे सारे तुमच्याबाबत यासाठी करत असते की, तुम्हाला तुमच्या हृदयाची रहस्ये कळावीत आणि त्या ज्ञानाने जीवनहृदयाचा अंश व्हावे.

**विवाह** : तुम्ही एकमेकांचे प्याले जरूर भरा, पण एकाच प्यालातून दोघेही पिऊ नका. तुम्ही तुमची हृदये एकमेकांना द्या, पण ती एकमेकांच्या ताब्यात देऊन नका, कारण फक्त जीवनाचा हातच तुमची हृदये सामावू शकतो.

**दान** : तुमच्याजवळ जे काही आहे ते सर्वच एक दिवस दिले जाणार आहे. म्हणून आत्ताच द्या की, ज्यामुळे दानाचा ऋतू हा तुमचा असेल, तुमच्या वारसांचा नव्हे.!

**काम** : तुम्ही एखादे काम करता तेव्हा तुम्ही एक बासरीच असता, जिच्या हृदयातून काळाच्या कुजबुजीचे संगीतात रूपांतर होते. काम म्हणजे दृश्य प्रेम.. प्रेमाने काम करणे म्हणजे आपल्या हृदयातून काढलेल्या धाग्यांचे वस्त्र विणणे, जणूकाय आपली प्रेयसीच ते अंगावर घालणार आहे.

**वस्त्रे :** तुमचे कपडे तुमचे बरेचसे सौंदर्य लपवून ठेवतात, पण ते तुमची कुरूपता लपवू शकत नाहीत.

**कायदे** : तुम्ही ढोल झाकून टाकू शकाल आणि वीणेच्या ताराही ढिल्या करू शकाल; पण.. पण तू गाऊ नकोस असा आदेश चंडोल पक्षाला कोण देऊ शकेल?

**स्वातंत्र्य** : तुम्ही तेव्हाच स्वतंत्र व्हाल, जेव्हा स्वातंत्र्याचा शोध घेण्याची तुमची इच्छा देखील एक बंधनच होईल आणि स्वातंत्र्य म्हणजे एक ध्येय व परिपूर्ती असे म्हणायचे तुम्ही थांबवाल.

**दुःख** : तुमचे बरेचसे दुःख हे तुम्ही स्वतःच निवडलेले असते. ते औषधाचा कडू डोसच होय. त्याच्या साहाय्याने तुमच्यातील वैद्य तुमच्या आजारी व्यक्तित्वाला दुःखमुक्त करतो.

**आत्मज्ञान** : 'मला संपूर्ण सत्य सापडले आहे' असे काहीही म्हणू नये त्याऐवजी 'मला थोडेसेच सत्य सापडले आहे' असे म्हणावे.

**मैत्री :** तुमची गरज भागवणे हा मैत्रीचा धर्म आहे, तुमचे रितेपण भरून काढणे हा नव्हे.

**मृत्यू** : मरणे म्हणजे वाऱ्यात नग्न उभे राहणे आणि सूर्यप्रकाशात वितळून जाणे नव्हे का? श्वासाला त्याला

होणाऱ्या त्रासातून मुक्त करणे की, ज्यामुळे त्याने वर जावे, विस्तृत व्हावे आणि आपल्या देवाला शोधावे.

कुलाब्याच्या जहांगीर आर्ट गॅलरीला भेट दिल्यावर रमत गमत बोरीबंदर दिशेने चालत येताना वाटेतील फुटपाथवर ठेवलेल्या पुस्तकांच्या खजिन्याकडे एक :कटाक्ष टाकून, काही पुस्तके धुंडाळून पुढे जाणे हा माझा नेहमीचा शिरस्ता. त्यादिवशी पुस्तकांच्या मांदियाळीत कोपऱ्यात पडलेले एक अनुवादित पुस्तक उचलले, चाळले आणि झटकन घेऊनही टाकले. माझ्या कॉलेज जीवनात ज्या कवीने, चित्रकाराने काही काळ आम्हाला वेड लावले होते त्या कवीचे 'द प्रॉफेट' 'द मॅडमन' हे डॉ सहदेव चौगुले-शिंदे यांनी अनुवादित केलेले अप्रतिम पुस्तक गवसले. त्या महान कवी, लेखक, चित्रकार, व भाष्यकाराचे नाव आहे खलील जिब्रान. पूर्वी कधीतरी श्रीपाद जोशी यांनी अनुवाद केलेले " रैहाना" (प्रकाशन-१९७६) हे खलील जिब्रानवरचे चरित्रात्मक पुस्तक वाचले होते. मात्र त्याचे विस्मरण झाले होते. त्यानंतर थेट आता पुन्हा तब्बल पस्तीस वर्षांनी हा महाकवी नव्याने भेटला तो या पुस्तकाच्या रूपाने.

कवी, लेखक, चित्रकार खलील जिब्रान यांनी अरेबिक आणि इंग्रजी भाषेत विपुल लेखन केले. त्यांच्या ग्रंथांचे विविध भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. त्यापैकी जिब्रान यांचा ' 'द प्रॉफेट' हा ग्रंथ १९२३ मध्ये प्रकाशित झाला तर 'द मॅडमन' हा ग्रंथ पूर्वीच म्हणजे १९१८ साली प्रकाशित झाला. 'द मॅडमन' हा जिब्रानचा पहिला इंग्रजी ग्रंथ होय. या दोन्ही ग्रंथांचा एकत्रित अनुवाद हा कोल्हापूरचे प्रसिद्ध लेखक डॉ सहदेव चौघुले-शिंदे यांनी नेमकेपणाने आणि रसाळपणे केला आहे. कोल्हापूरच्याच रिया पब्लिकेशन्स यांनी हे पुस्तक २०१६ मध्ये प्रकाशित केले. प्रॉफेट या शब्दाचा अर्थ म्हणजे प्रेषित. म्हणजे मानवाच्या कल्याणासाठी, समृद्धीसाठी ईश्वराने पाठवलेला देवदूतच. 'द प्रॉफेट' हा जिब्रानचा सर्वोत्कृष्ट ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये जिब्राननने जीवनाविषयक आणि आयुष्यातील महत्वाच्या विषयांवर, प्रसंगांवर सखोल आणि सूक्ष्मपणे चिंतन केलं आहे. या लेखाच्या प्रारंभी जिब्राननने विविध विषयांवर केलेलं मुक्त चिंतन वाचकांसाठी दिलं आहे. ते जरूर वाचावं, स्मरणात ठेवावं. जिब्राननने ग्रंथात साकारलेलं हे जीवनाविषयक तत्वज्ञान वाचल्यावर आपण निःशब्द होतो. कमीतकमी शब्दात किती मोठा आशय जिब्राननने आपल्याला बहाल केला आहे याचीही

प्रचिती येते. या ग्रंथात कुठलाच विषय व्यर्ज नाही. प्रेम या सार्वत्रिक विषयापासून झालेली सुरवात थेट मृत्यू पर्यंत येऊन विसावते. 'द प्रॉफेट' या ग्रंथात खलील जिब्रानने आपल्या मुक्त चिंतनांत उपमा आणि रूपके यांचा मुक्त वापर केला आहे आणि तोही परिणामकारक. साध्या,सोप्या आणि सरळ शब्दशैलीत जिब्रानने मनातले गुज कथन केले आहे. बायबलच्या शैलीचा मोठा प्रभाव जिब्रानच्या लेखन शैलीवर पडलेला आपणास सहजपणे जाणवतो. तरीदेखील जिब्रानने आपल्या स्वतंत्र विचारशैलीने या भाषाशैलीवर मात केली आहे. भावनेची खोली आणि विचारांची उंची जिब्रानच्या साहित्यात आपणास आढळते. हा खलील जिब्रान नक्की कोण? मूळचा कुठला? कशासाठी त्याने हा अट्टाहास केला तेही आता आपण जाणून घेऊया.

कवी, लेखक, चित्रकार, भाष्यकार खलील जिब्रान याचा जन्म ६ जानेवारी १८८३ रोजी सीरियातील माऊंट लेबेनॉनमधील 'बिशेरी' या गावी झाला. जिब्रानच्या वडिलांचे नाव खलील होते, खलील म्हणजे खरा मित्र. तर जिब्रान याचा उच्चार 'जब्रान' असाही करीत. आता 'जब्रान' याचा अर्थ

जोडणारा, नीट करणारा. जिब्रानच्या आईचे नाव कामिला. म्हणजे पूर्णावस्थेत पोचलेली व्यक्ती. जिब्रानचे आई-वडील हे अतिशय धार्मिक वृत्तीचे होते. आजोबांचे नावही जिब्रान असेच होते. त्यामुळे या मुलाचे नाव झाले जिब्रान खलील जिब्रान.! जिब्रान पुढे मोठा झाल्यावर आपल्या नावातील एक जिब्रान काढून तो खलील जिब्रान या नावानेच लेखन करू लागला. घरच्या गरिबीमुळे जिब्रानला लेबेनॉन इथे औपचारिक शिक्षण मिळाले नाही मात्र धर्मोपदेशकांनी त्यांच्या घरी जाऊन त्याला बायबल आणि अरेबिक भाषा शिकवली. इ.स. १८९१ मध्ये आर्थिक अफरातफर केल्याच्या आरोपामुळे जिब्रानच्या वडिलांना तुरुंगात टाकले. वसुलीसाठी मालमत्ता जप्त केली. त्यामुळे पोटापाण्यासाठी जिब्रानच्या आईने न्यूयॉर्क इथे जिब्रान आणि दोन मुलींसह जाण्याचे ठरवले. तिने तिथे पडेल ते काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवला. जिब्रान तेथील शाळेत जाऊ लागला. इथेच जिब्रान चित्रकलेच्या माध्यमातून व्यक्त होऊ लागला. तिथे फ्रेड हॉलंड डे या प्रसिद्ध फोटोग्राफर आणि प्रकाशक याच्या ओळखीमुळे, व उत्तेजनामुळे जिब्रानची चित्रे अनेक पुस्तकांच्या, मासिकांच्या मुखपृष्ठावर विराजमान झाली. जिब्रानच्या आईला वाटे की जिब्रानने पाश्चिमात्य संस्कृती

जपण्यापेक्षा अरेबिक संस्कृती शिकावी. त्यामुळे पंधराव्या वर्षी जिब्रान पुन्हा लेबेनॉन इथे परत आला. तेथील महाविद्यालयात शिकत असताना कवितेची गोडी लागली आणि जिब्रान हा त्या कॉलेजचा उत्कृष्ट कवी म्हणून निवडला गेला. १९०२ मध्ये जिब्रान पुन्हा बॉस्टनला आला. जिब्रानच्या दुर्दैवाने पुढे सावत्र भाऊ पीटर, बहीण सुलतान हे क्षयाने आणि आईचे कॅन्सरने निधन झाले. हा धक्का मोठा होता. १९०८ ते १९१० या कालावधीत जिब्रानने पॅरिसमध्ये चित्रकला हा विषय अभ्यास म्ह्णून स्वीकारला. १९०४ मध्ये त्याने बोस्टन इथे आपले पहिले चित्रप्रदर्शन भरवले. प्रदर्शनात मुख्याध्यापीका मेरी एलिझाबेथ हिच्याशी परिचय वाढून पुढे त्याचे प्रेमात रूपांतर झाले. परंतु तिच्या घरातून विरोध झाल्यामुळे जिब्रानशी तिला लग्न करता आले नाही. तरीही तिने जिब्रानला शेवटपर्यंत साथ दिली. दरम्यान तिचे भलत्याच माणसाशी लग्न झाले मात्र जिब्रानला ती छुपेपणाने आर्थिक मदत करीत राहिली. हे सारे विलक्षण प्रसंग जिब्रानने आपल्या साहित्यकृतीत आणि चित्रकलेमध्ये साकारले. अखेर १० एप्रिल १९३१ रोजी न्यूयॉर्क इथे खलील जिब्रान या थोर कवीचा चटका लावणारा मृत्यू यकृताच्या आणि क्षयाच्या व्याधीने झाला. त्याचे दफन लेबेनॉन इथेच

करण्यात आले. तिथे त्याच्या स्मरणार्थ 'जिब्रान म्युझियम' उभारले गेलं .

जिब्रानला राजकारणी माणसांचा प्रचंड तिटकारा होता. जिब्रानवर ख्रिस्ती, इस्लाम, बौद्ध, बहाई या धर्मांचा विशेष प्रभाव होता. तरीही धार्मिक कर्मकांड याला त्याने विरोधच केला. जिब्रानला एक विलक्षण अध्यात्मिक दृष्टी होती. पृथ्वीवर संचार करणारा माणूस हा एकच आहे, मानवता हाच धर्म आहे असे मानणारा आणि प्रत्यक्षात अंमलात आणणारा तो एक थोर कवी, लेखक, चित्रकार होता. एकाचवेळी लेखणीवर आणि ब्रशवर सारखेच प्रभुत्व असणाऱ्या या कवीचा 'द मॅडमन' हा ग्रंथ १९१८ मध्ये प्रकाशित झाला. एका वेड्याने सांगितलेल्या छोट्या पस्तीस बोधपर गोष्टींचा हा सुंदर संग्रहच आहे. या ग्रंथात जिब्रानची शैली उपरोधिक अशी आहे. त्यातील छोटासा परिच्छेद देतोय. माणूस कोणती नैतिक व अध्यात्मिक उंची गाठू शकतो हे या परिच्छेदामधून अधोरेखित केले आहे.

" जर तुमच्या उजव्या डोळ्याने गुन्हा केला तर तो काढून टाका आणि दूर फेका. जर उजव्या हाताने गुन्हा केला तर तो

हात कापून दूर फेका. कारण तुमचे संपूर्ण शरीर पुढे नरकात फेकले जाण्यापेक्षा तुमचा एक अवयव नष्ट होणे हे तुमच्या दृष्टीने फायदेशीर आहे."

आज आपण आजूबाजूस काय पाहतोय तर, अवघ्या विश्वात अशांतता, अस्वस्थता दाटून राहिली आहे. माणसाचे माणूसपण हरवत चालले आहे. अशा परिस्थितीत भाष्यकार खलील जिब्रानचे आश्वासक बोल मनाला विलक्षण शांती देऊन जातात, उभारी देतात. आयुष्याच्या वेगवेगळ्या वळणावर जिब्रान सतत भेटत रहावा असेही वाटते.

**(द प्रॉफेट (वैचारिक/चरित्र), मूळ लेखक- खलील जिब्रान, अनुवाद डॉ सहदेव चौघुले-शिंदे, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर)**

****************************

दिवसातून दोन तास पुस्तक वाचणे आणि तेवढाच वेळ फ़ेसबुक किंवा whatsapp वरच्या पोस्ट्स वाचणे यात नेमका काय फ़रक असतो? असतो का? दोन्हीही वाचनच ना!

रोज एका गार्डनला प्रदक्षिणा घालत आठ-दहा किमि. चालण्याऐवजी रोज तेवढाच वेळ एका दिशेने चालत राहिलं तर माणूस पाच महिन्यांत मुंबईहून दिल्लीला पोहोचेल. नेमका हाच फ़रक फ़ेसपुस्तक आणि पुस्तक यांच्यामधे असतो.

पुस्तक वाचन एखाद्या मोठ्या गुंतवणुकीसारखे असते जे तुम्हाला श्रीमंत करत असते. Whatsapp, facebook मधले ज्ञान खिशात बाळगलेल्या चिल्लरसारखे असते. त्याच्या आधारे तुम्ही फ़ार तर वेळ मारून नेऊ शकता.

पुस्तक वाचन तुम्हाला पुढे नेते, प्रगतीच्या वाटेवर नेते. एका दिशेला नेते. एका उंचीवर नेते. पुस्तके वाचणारे लोक इतरांहून अधिक शहाणे असतात. शहाणे होतात. वाचनात सातत्य असणारे अधिकाधिक शहाणपण मिळवत रहातात.

अनुभवाहून उत्तम पुस्तक नाही असे म्हटले जाते. पण शेवटी पुस्तक म्हणजे काय? कोणाचे तरी अनुभवच ना? असे दुसऱ्याचे अनुभव वाचून माणूस शहाणा होतो. पुढच्याच्या ठेचा मागच्याला

शहाणे करून सोडतात. मग ते पुस्तक दुसऱ्या देशातील लेखकाचे असो वा दुसऱ्या काळातील लेखकाचे. शहाणपण गॅरंटीड.

**वाचत रहा. ग्रंथानंद घेत रहा.**


www.esahity.com

esahity@gmail.com